


# श्री साईलीला


या अंकांत—


- फकिरी अव्वल बादशाही
- बाबांनी दाखविलेला साक्षात्काराचा मार्ग
- आसरा संतांचा
- श्रीसाईबाबा हीच आमची माऊली
- साहित्य-समालोचन
- संतांचा प्रसाद
- नामदेवांची अमृतवाणी !
- श्रीसाईबाबा पुण्यतिथी ( शके १८८९ )
- सुखाचा शोध
- हेलन
- शिरडी वृत्त



डिसेंबर १९६७

० पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू

सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ३५५७३१



# श्री साईं वाक्सुधा

आपण नेहमीं चांगली इच्छा बाळगावी. कोणाचंही वाईट चिंतूं नये. मनांत नेहमीं सद्विचार घोळत रहावे. मग पहा काय चमत्कार घडतो! जशी इच्छा तसें फळ: इच्छेप्रमाणें आपल्या हातून कृतीही घडावी. नाहीं तर बोलायचें एक आणि हातून घडत असावें वेगळेंच! वृत्ति, कृती, एकजीव, एकरूप झाल्या पाहिजेत; म्हणजे साईबाबा तुमच्या मनीचें कोड पुरविल्याशिवाय रहाणार नाहींत. श्रद्धा मात्र बळकट असली पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४६ वें ] डिसेंबर १९६७ [ अंक ९ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

गुरु कोणाला समजायचें ? जो अज्ञानापासून आपली सुटका करतो, जो आपणास जीवनोपयोगी ज्ञान देतो तो. मग तो मानवरूपी असेलच असें नाहीं. आपण मोहाच्या अंधःकारांत गडप होऊन गेलेले असतों. त्या मोहामुळें आम्हांला कोठेंही प्रकाश दिसत नाहीं. त्या अंधःकारांतून आम्हांला बाहेर काढणारा व निर्मळ प्रकाश दाखविणारा तो गुरु.

असा जो कोणी तो प्रत्यक्ष परमेश्वरच समजला पाहिजे. आमची उन्नति झाली पाहिजे; त्यासाठीं जरूर तें ज्ञान आम्हांला प्राप्त झालें पाहिजे. आमची पीछेहाट होतां कामा नये. याची काळजी भगवंताला. मग कोणत्या ना कोणत्या रूपानें तो आमचे डोळे कोणाकडून तरी उघडवितो.

श्रीमद्भागवतांत श्रीदत्तात्रय व यदु राजा यांचा गुरुशिष्यासंबंधीं उद्‌बोधक संवाद आलेला आहे. श्रीदत्तात्रयांनीं आपले अनेक गुरु मानिले. त्यांचे सर्वच गुरु मानवदेहधारी नव्हते. त्यांत पशूही आहेत नि भ्रमरासारखे पक्षीही आहेत. जल, वायु, अग्नि यासारखी तत्त्वेंहि त्यांत आहेत. त्यांच्या गुरूंची संख्या चोवीसपर्यंत गेली होती.

श्री दत्तात्रय हे गुरूच्या शोधार्थ इकडे तिकडे भटकत नव्हते. त्यांना कशाला भटकायला हवें ? ते स्वतः गुरूंचे गुरु, परात्पर गुरु होते. त्यांनीं जें कांहीं सांगितलें तें केवळ यदुराजासाठींच नव्हतें. तें तुम्हां आम्हां सर्वांसाठीं होतें. श्रीकृष्णांनीं गीता सांगितली ती केवळ अर्जुनासाठींच का ? ती सर्व मानवजातीसाठीं होती नि आहे.

श्री दत्तात्रय म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेश. हे तिघेही आपले गुरु आहेत. ईश्वर म्हणजे गुरु व गुरु म्हणजे ईश्वरच. ईश्वर नि गुरु यांमध्यें भेदभाव नाहीं.

शिष्याच्या कल्याणासाठीं, त्याच्या उन्नतीसाठीं गुरु काय वाटेल तें करील. शिष्याचे लाड पुरविण्यासाठीं गुरु नसतात. त्याला जें आवडतें तें करणें यासाठीं गुरु नसतो. त्याला जें श्रेयस्कर असेल, जें त्याच्या शाश्वत कल्याणाचें असेल तें करण्यासाठीं झटावयाचें हें गुरूचें लक्ष असतें. त्यासाठीं गुरूला कधीं कधीं कठोर व्हावें लागतें. कशासाठीं ? शिष्यवराच्या शाश्वत कल्याणासाठीं. गुरू हे बहुधा कठोर मनाचे असतात. परंतु ते कनवाळू नि कृपाळूही असतात. संत कसे ? 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदूं ऐसे ॥' गुरुही तसेच. ईश्वरही तसाच दयाळू नि कठोरही बनतो.

जगांत आपल्या सभोंवार नानाप्रकारचीं तत्त्वें, माणसें, पशुपक्षी वावरत आहेत. त्याच्यापासून आपणास बोध घेतां येईल तो घ्यावयाचा नि स्वतःमध्यें जरूर ती सुधारणा घडवून आणावयाची; हा श्रीदत्तात्रयाचा कल्याणकारी मार्ग आहे आणि तो आपण स्वीकारावयाचा आहे.

या जगांत आम्हीं पुढें पुढें जायचें आहे. आपणाला आगेकूच करायची आहे. त्यासाठीं जें जें उन्नतिकारक तें तें स्वीकारायचें आहे व अशारीतीनें पूर्णत्व मिळवायचें आहे.

हे प्रगतीचें कार्य एकाच जन्मांत परिपूर्ण होऊं शकत नाहीं. त्यासाठीं अनेक जन्म घ्यावे लागतील; परंतु प्रत्येकवेळीं आपण प्रगतीच्या मार्गावर असूं.

शिष्यानें गुरुच्या शोधार्थ बाहेर पडायला नको. शिष्य काय गुरूचा शोध लावणार ? गुरुच शिष्याचा शोध लावीत असतो. आपणास शिष्य या नात्यानें जवळ करण्यासारखी व्यक्ति कोण हें गुरुच जाणूं शकतो. शिष्याला, सुयोग्य शिष्याला शोधून काढण्याची जबाबदारी असते गुरुची. शिष्याची नव्हे.

शिष्याची शोध घेण्याइतकी ताकद नसते. समजा कीं, तुमच्यासमोर प्रति कालिदास बसला आहे, परंतु तो तुम्हीं ओळखूं शकणार नाहीं.

मग आमचें कर्तव्य कोणतें ? आपण प्रामाणिकपणें वागायचें. सत्याचरण करायचें, भक्तिभावानें ईश्वर स्मरण करायचें. मनांत पापी विचारांस थारा द्यायचा नाहीं.

आपलं अंतःकरण निर्मळ नि पवित्र हवें. अशा पवित्र मनाच्या माणसानें एक पाऊल पुढें टाकलें तरी ईश्वर त्याला हाताशीं धरून एकदम शंभर पावलांवर घेऊन जात असतो. तो वाटच पहात बसला आहे. माझ्या मार्गानें येण्याची आकांक्षा कोणी बाळगली आहे हें त्याला बरोबर समजतें. अशा साधक व्यक्तीबद्दल भगवंताच्या मनांत करुणा उत्पन्न होते. मी त्याच्याबद्दल काय करूं आणि काय नको; त्याला कुठें ठेवूं आणि कसा गोंजारूं, असें त्याला होऊन जातें. त्याचा प्रवास, पुढील प्रवास सुखकर व्हावा, याची मग तोच काळजी वाहूं लागतो. असा आहे तो करुणासागर !

हेंच पहा ना. महासागर अफाट पसरलेला असतो. त्याच्यांत विलीन होण्यासाठीं जागोजागच्या नद्या, नाले, घोडदौड करीत असतात. तसेंच आहे आपलें !

महासागराकडे जाण्याची मनाला ओढ लागून राहिली पाहिजे. कधीं त्याला जाऊन भेटेन नि त्याच्याशीं एकरूप होऊन जाईन अशी तळमळ लागून राहिली पाहिजे. ती तळमळच तारक ठरत असते.

आपण आपल्या अंतःकरणाचे दरवाजे बंद करून ठेवतां कामा नयेत. ते उघडे ठेवले पाहिजेत. अंतःकरण सदा निर्मळ ठेवलें पाहिजे.

आमच्या या सर्व साधनेचें ध्येय कोणतें ? आम्हांला साधायचें तरी काय ? भगवंताच्या चरणीं आत्मसमर्पण ! त्यासाठीं तुम्हीं भक्तियोगाची, ज्ञानयोगाची किंवा कर्मयोगाची कांस धरा. आत्मसमर्पण हेंच सर्वत्र अभिप्रेत आहे.

आम्हांला त्याच्याशीं योग साधायचा आहे. तो योग साधणें हेंच आत्मसमर्पण.

त्यासाठीं तपस्येची जरुरी आहे. आपलें शरीर, मन, बुद्धि, इंद्रियें हीं सर्व शुद्ध राखायचीं. आत्मानुग्रह, वैराग्य, एकाग्रता यांचीं अग्निकुंडें पेटवून त्यांत सारे दोष जाळून साफ करून टाकायचे, शुद्ध व्हायचें. ही तपस्या करणें जरूर आहे. तीच आपलें रक्षण करून त्याच्या चरणकमलांचें दर्शन घडविणार आहे.

त्यासाठीं बाबांची करुणा भाकायची कीं, हे करुणाघना, त्या मार्गानें जाण्याची मला बुद्धि दे. त्या मार्गावर मला स्थिर होऊन पुढील वाटचाल मला निर्विघ्नपणें करूं दे. या महान् कार्यांत तुम्हींच माझे मार्गदर्शक. मी तुम्हांला शरण आलों आहें. बाबांनीं शरण आलेल्यांचें रक्षण करून त्यांना उद्धाराचा मार्ग दाखविला आहे.

—संपादक



# फकिरी अव्वल बादशाही

*****************************

लेखक : द. शं. टिपणीस

**'फकिरी अव्वल बादशाही', बाबा असं म्हणत. ते फकीर होते. पण बादशहा होते, सम्राट होते. देशोदेशींची संपत्ती त्यांच्या पायांशीं येत असे व अजूनहि येत आहे. कोणत्याहि सम्राटाला मिळाला नाहीं एवढा मान या सम्राटाला मिळतो.**

जगांत मोठमोठे सम्राट होऊन गेले. राजकीय पुढारी होऊन गेले. लाखो लोक त्यांच्या भजनी लागले. त्यांना मान मिळाला, पण तो अल्पकाळ. लोकांचें काय ? आज जयजयकार करून एखाद्याला खांद्यावर नाचवतील तर उद्यां त्याला धोंडे मारतील. बाबांच्या बाबतींत उलट झाले. सुरवातीस वेडा फकीर म्हणून लोकांकडून त्यांची अवहेलना झाली. खडेहि मारले असतील. पण नंतर आज ? नंतर त्यांना खांद्यावर घेऊन 'साईनाथ महाराज की जय' म्हणून लोक नाचूं लागले व बाबांना लौकिक दृष्टीनें जाऊन ५० वर्षे होत आली तरी लोक नाचताहेत. भारतांतीलच नव्हे, तर देशोदेशींचे लोक बाबांच्या भजनी लागले आहेत. वर्षाकाठीं लाखों लोक बाबांच्या पायांशीं नतमस्तक होण्यासाठीं शिर्डीला येतात. आज शिर्डीला बादशाही वैभव झळाळत आहे. बाबांचें वैभव खरें, पण तें भक्तहि भोगतात. सांगा असा कोणता सम्राट जगांत होऊन गेला कीं, ज्याचें वैभव त्याची प्रजा भोगूं शकली ? राजे व बादशाहा वैभवांत व सुखांत राहतात. प्रजेच्या नशिबीं हें कांहीं येत नाहीं. राजेमहाराजे स्वतः भरपूर खातात व उत्तम कपडे वापरतात. बाबा स्वतः खाल्लें तर खाल्लें नाहींतर नाहीं, पण दुसऱ्यांना पोटभर खायला घालीत आहेत. स्वतां फाटकी कफनी वापरतील पण भक्तांना धडके कपडे देतील. राजेरजावाडे प्रासाद महालांत राहतात व त्यांची प्रजा झोंपड्यांतून व मोडक्यातोडक्या जुन्या घरांतून राहते, पण बाबा पडक्या मशिदींत राहात व त्यांचे भक्त चांगल्या घरांतून राहतात. राजे लोकांना बड्या लोकांशीं दोस्ती राखण्यासाठीं व प्रजेला आपल्या आज्ञापालनांत ठेवण्यासाठीं अनेक अधिकाऱ्यांची मदत घ्यावी लागते व फिरावें लागते. दौरे काढावे लागतात. बाबा ६० वर्षे एकाच जागीं शिर्डीला बसून होते. त्यांनीं कोणाशीं मुद्दाम दोस्ती करण्याचा प्रयत्न कधींच

केला नाहीं. लोक मात्र त्यांची दोस्ती करण्यास आतुर असत. त्यांच्या वतीनें काम करण्यास कोणी अधिकारी त्यांनीं नेमला नव्हता. त्यांचा शब्द हाच अधिकारी. शहरांतील विजेच्या दिव्यांचें मेन स्विच ज्याच्या ताब्यांत आहे त्याला शहरांतील दिवे लावण्यासाठीं घरोघर फिरावें लागत नाहीं. बटणांच्या हालचालीवर हें सर्व होतें. तसेंच हें बसल्या जागीं कळ दाबून हवें ते कार्य तें घडवून आणतात वा बंद पाडतात. हृदयां-हृदयांतील मेन स्विच ज्याच्याकडे आहे त्यांना काय कमी? आपली महती व महत्त्व यासाठीं त्यांना वर्तमानपत्र व फोटोग्राफरकडे धांव घ्यावी लागली नाहीं कीं, प्रचारसभा घडवून आणाव्या लागल्या नाहींत. लोकांनीं आपखुशीनें त्यांची महती जगभर पसरवून दिली. कस्तुरीला कां कोठें आपल्या सुगंधाची जाहिरात करावी लागते? कार्यासाठीं पैसा, पैशासाठीं फंड व फंडासाठीं दौरे असलें तंत्र त्यांच्याकडे नव्हे. बसल्या जागीं त्यांच्यापायीं पैसा येई व येतो आहे. जग जिंकता आलें नाहीं म्हणून शिकंदर रडला आणि बाबांनीं हसत हसत जग जिंकले. बाबांची फकिरी सम्राटापेक्षांही श्रेष्ठ ठरली. जो लोकांच्या हृदय सिंहासनावर बसला तो सम्राट नव्हे तर कोण? म्हणून बाबा म्हणाले, फकिरी अव्वल बादशाही. निदान बाबांच्यापुरते तरी हें पुरेपूर खरें आहे.

## देवाकडे धांव कां घेतात?

पण इतरांच्या बाबतींत बाबा सांगतात तें खरें धरून चालायचें काय? लोकांनीं वैभव, संपत्ति, अधिकार मिळवूंच नये काय? फकिरी पत्करून गरिबीतच दिवस काढावे? असें असेल तर मग देवानें निर्माण केलेल्या वैभवाचा आस्वाद, भोग, रस कोणी घ्यावयाचा? न घेतला तर देवाचें मोठेंपण, कर्तृत्व व सामर्थ्य मानवाच्या प्रत्ययास कसें येईल? आपल्या वैभवशाली सृष्टीचें मानवानें कौतुक करावें म्हणून देवानें त्याला उत्पन्न केलें. त्याचें काय? देवानें दिलेले भोग न भोगले तर मग देवाला मोठेपण व मान कोण देईल? देवानें निर्माण केलेलें वैभव मिळावें व मिळालेलें टिकावें म्हणून तर लोक देवाकडे धांव घेतात. त्याची भक्ति करतात. त्याला आळवतात. हा मानवी वृत्ति आहे. आपलें काम व्हावें म्हणून वशिला लावणें हा मानवी स्वभाव आहे. फकिरी पत्करली कीं हें सर्व गेले. वैभव गेले. संपत्ती गेली. जगांतले हजारों व्यवहार बंद पडले. असें झालें तर मग मानव रानटी अवस्थेलाच पुन्हां गेला म्हणायचा. मानवासकट सर्व सृष्टीची जी एवढी प्रगती झाली आहे ती पुन्हां मागें मूळ ठिकाणीं म्हणजे रानटी अवस्थेप्रत जाऊं शकेल काय? ज्या बीपासून झाड झालें त्या बीमध्यें तें झाड पुन्हां सामावेल काय? त्या झाडापासून अनेक बिया निर्माण होतील व त्या बियांतून दुसरी अनेक झाडें होतील. सृष्टीचा वाढता वसा

आहे हा. मग बाबा असें म्हणाले तरी कसे ? बाबा काय विनोद करतात कीं थट्टा ? पण बाबांच्या विनोदांतहि सत्य असे. केवळ कल्पना नसे. बाबांनीं ग्वाही दिलेय कीं मी सत्य तेंच बोलतो. अनुभवही तसाच आहे. बाबा चार शब्द बोलतात, पण त्यांत चारशें शब्दांचा अर्थ असे. एवढें बरीक मात्र खरें कीं, तो अर्थ झटकन् कळणें कठीण, असेच हे तीन शब्द. विचार करूं. कांहीं समजतय कीं काय पाहूं.

## फकीर बादशहा कसा होईल ?

फकिरी अव्वल बादशाही. फकिरी व बादशाही दोन्ही दोन बाजूचीं टोंके. बादशहाचा एक वेळ फकीर होईल, पण फकीर आहे तो बादशहा कसा होणार ? आणि तोही अव्वल ? पश्चिम पूर्व दिशेला कां जाऊं शकली ? मुंगी उडाली आकाशीं असेंच कांहींतरी अशक्य भासतें हें बोलणें. तिन्ही शब्दांतील एकत्र अर्थ नाहीं उमगत. ठीक. प्रत्येक शब्दाचा स्वतंत्र अर्थ पाहूं. मघला शब्द अव्वल हा सहज समजण्यासारखा आहे. अव्वल म्हणजे अस्सल. अस्सल म्हटले म्हणजे त्यांत कोणत्याही प्रकारची भेसळ, खोटेपणा असत नाहीं. त्याचा दर्जा उच्च असतो. सर्व मालांत उत्कृष्ट. उत्तमांत उत्तम तें. सर्वांत उत्तम आहे तें. जगांत सर्वांत उत्तम कोणतें ? या सृष्टींत सर्वांत उच्च, अस्सल काय ? हें विश्व मिश्रण आहे. जगांतील सर्व पदार्थ सजीव वा निर्जीव मिश्रणानें तयार झालेले आहेत. ही मिश्रणे करणारा जो, जी शक्ति, जें चैतन्य—कांहींही नांव द्या—तें अस्सल आहे. एकजिनसी आहे. ती एकमेव शक्तीच अस्सल आहे. ती फक्त सत्य आहे, सुंदर आहे व आहे. बाकी सर्व सत्य असत्य, चांगले वाईट आणि आहे व नाहींचें मिश्रण आहे. हें सर्व कमअस्सल. अव्वल बादशाही म्हटले कीं त्याचा अर्थ होतो कीं तिचा विरोध अशी दुसरी बादशाही असली पाहिजे व ती म्हणजे कम-अस्सल बादशाही. हा चालू माल सर्वांच्या परिचयाचा व सर्वांना हवासा असलेला. म्हणून बाबांना अव्वल बादशाहीची आठवण देणें भाग पडलें. अव्वल बादशाही झटकन् लक्षांत येत नाहीं पण कमअस्सल बादशाही झटकन लक्षांत येते. कारण ती आपल्या जीवनांत हरघडी दृष्टीस पडते. यास्तव तिचा प्रथम विचार करूं, त्यामुळें अव्वल बादशाही समजण्यास सोपे जाईल.

## राजांचा राजा तो बादशहा

बादशहा कोणाला म्हणतात ? राजांचा राजा तो बादशहा. अनेक राजांवर जो राज्य करतो तो. त्याचा अधिकार व सामर्थ्य मोठें असतें. तो म्हणेल त्याप्रमाणें प्रजाजनांनीं व इतर राजांनीं वागलें पाहिजे. बाहुबल, सैन्यबळ व लोकबल त्याला भरपूर असते. यामुळें कोणीही त्याचा शब्द खाली पडूं देत नाहीं. अलोट संपत्तीचा

मालक असतो तो. मोठ्या सुंदर भव्य अशा राजवाड्यांत तो रहातो. त्याच्यासह त्याचें कुटुंबीय तीन असले तरी राजवाड्याला तीस खोल्या असतात; कारण त्याचा लवाजमा मोठा असतो व तो त्याच्याचबरोबर राहतो. त्याची सर्व कामें करायला भरपूर नोकरचाकर असतात. त्याचा कपडा उंचीतला उंची असतो. सर्वप्रकारची पक्वान्नें व नाना पौष्टिक पदार्थ त्याच्या जेवणांत असतात. सदैव पायघड्यावरून व पायांत घालून तो चालतो. त्याचा पाय जमिनीला कधीं लागत नाहीं, पण हात मात्र आकाशाला लावण्याचा तो प्रयत्न करतो; कारण आपण सर्वश्रेष्ठ अशी त्याची भावना असते. तो सदैव गाड्याघोड्यांतून फिरतो. राजसिंहासनावर बसतो व गाद्यागिर्द्यांत लोळतो. संरक्षणासाठीं त्याच्याभोंवतीं कडेकोट बंदोबस्त असतो. बादशहाची स्वारी कोठेंही जायची ती थाटामाटांत. त्याच्या खजिन्यांत संपत्ती असते तर हृदयांत आपत्तीची धास्ती असते. सत्ता असते, पण ती टिकविण्याच्या चिंतेची टांगती तलवार त्याच्या डोक्यावर सदैव लोंबती असते. संपत्ती व सत्ता यांमुळें त्याच्या ठिकाणीं श्रेष्ठपणाचा अभिमान असतो. इतरांच्या विचारांना तो कमी लेखतो. अहंकारामुळें आसक्ती वाटून सत्ता व वैभव यांच्या सदैव तो मागे लागतो. माणूस व माणुसकी ही त्याला ओळखूं येत नाहीं. गीतेंत सांगितलेल्या आसुरी संपत्तीचा तो धनी असतो. नाना विकार व विषय त्याच्या राजवाड्यांत मनमोकळे हिंडत असतात. त्यांची बादशाही नाशिवंत असते. राजाचा रंक क्षणार्धांत होऊं शकतो. त्याचें सामर्थ्य त्याच्यापेक्षां इतरांच्या बलावर अवलंबून असते. त्यामुळें बादशहा असूनहि तो अनेकांचा गुलाम असतो. आपलें आसन स्थिर टेवणें हा एक त्याच्या मागें उद्योगच असतो. अनेकांचें स्वातंत्र्य त्यानें हिरावून घेतल्यामुळें त्याचेंहि स्वातंत्र्य हरविलेले असतें. सैन्य व मंत्री यांच्यावर तो अवलंबून असतो. त्या सर्वांना सांभाळून वागण्याची तारेवरची कसरत त्याला करावी लागते. कोठेंहि स्वतंत्रपणें एकटे मनमोकळे त्याला फिरतां येत नाहीं. देवा, माझ्या माणसांपासून मला वांचव असें म्हणण्याची त्याच्यावर पुष्कळ वेळां पाळी येते. दिसायला बादशहा पण असतो गुलाम. असें हें वैभव म्हणजे कमअस्सल बादशाही व सत्ता व सिंहस्थनस्थ असूनहि जेथें हें सर्व नसते ती अव्वल बादशाही.

## तो काय जिंकतो ?

अव्वल बादशाही बरोबर याच्या उलट असते. हा बादशहा वैभवशाली संपत्तीवान् सिंहासनस्थ असतो. त्याचें वैभव त्यानें मिळविलेले नसते. त्यासाठीं तो कधीं खटपट, प्रयत्न वा श्रम करीत नाहीं. वैभवाला तो विन्मुख असतो. पण सावलीप्रमाणें वैभव व संपत्ती त्याच्या मागें मागे येतें. त्याचें बल व सामर्थ्य सैन्यावर वा मंत्र्यांवर अवलंबून नसते. त्याच्या शक्तीचा झरा अंतर्गत असतो. सूर्य जगाला

प्रकाश देतो म्हणून कांहीं त्याला पॉवर हाऊसची जरूरी नसते. वास्तव तो सैन्य बाळगीत नाहीं कीं त्याला सल्ला द्यायला मंत्रीमंडळ नसते. त्याचाच सल्ला घ्यायला लोक धावून धावून येतात. अनेक राजेरजवाडेच काय लाखों लोक त्याच्या आज्ञेंत वर्तत असतात. तो कांहीं मिळवायला जात नाहीं कीं कांहीं कोणाकडे मागत नाहीं; त्याच्याकडे मागायला मात्र पुष्कळ येतात. कोणाचाही प्रदेश जिंकण्याची त्याची इच्छा नसते. जिंकतो तो फक्त मानवी अंतःकरणें, लोकांच्या हृदयसिंहासनावर तो अधिष्ठीत असतो. लोककल्याणाचा राजदंड त्याच्या हातीं असतो. शांति धर्माचें, बंधुत्वाचें व दयेचें तिरंगी निशाण त्याच्या प्रासादावर फडकत असते. लोक आपखुशीनें त्याच्या पायीं शरण येतात व त्याचा अधिकार व सार्वभौमत्व मान्य करतात. सूर्याला ग्रहमालेचा बादशहा कोणी केला ? तो आपल्या तेजानें आपोआप झाला. आपलें तेज इतर ग्रहांना देऊन तो त्यांना जीवन देतो एवढेंच नव्हे तर त्याच्याचमुळें इतर ग्रह टिकून राहतात. म्हणून ते त्याचें सार्वभौमत्व मान्य करून त्याच्या भोंवतीं पिंगा घालीत आहेत. कृष्णाभोंवतीं नव्हत्या कां गोपगोपिका फेर धरून रासक्रीडा करीत ? कृष्णानें कां त्यांना आमंत्रणे केली होती ? लोहचुंबक लोखंडाला कधीं आमंत्रण देत नाहीं. कृष्णाच्या मुरलीच्या स्वरांनीं गोपींच्या अंतःकरणांतील भक्तीच्या तारा छेडल्या जात व त्या कृष्णाकडे धाव घेत. तान्हुले नाहीं कां आपल्या आईकडे झेप घेत ? अगदीं तसेंच. असाच मान अव्वल बादशहाला मिळतो. मग त्याला शत्रू राहिलेच कोठें व त्याचा हेवादावा तरी कोण करणार ? हृदयसिंहासनावरून त्याला कोण खाली उतरविणार ? त्याला भीति कसली ? उलट भीतीच त्याला भिऊन पळून जाते. तो निर्भय असतो. स्वतंत्रपणे तो कोठेंही जाऊं येऊं शकतो. त्याला रक्षकांची जरूर नसते. तोच इतरांचें रक्षण करतो. हा बादशहा मनांत येईल तेव्हां स्वच्छंदपणें प्रवास करतो. त्याला दिक्कालाची आडकाठी नसते. कोण अडवितो रामाला ? असा हा बादशाह. त्याची बादशाही चिरंजीव असते. काम, क्रोध, काळज्या, चिंता यापासून तो मुक्त असतो व सदैव आनंदात वावरत असतो. अव्वल बादशाही ती हीच व ती फकिरीमुळें मिळतें असें बाबांना सांगावयाचें आहे.

## फिकीर नाहीं ती फकिरी

फकिरी म्हणजे काय ? भिक्ष्यांदेही ? नव्हे. ज्यात फिकीर नाहीं ती फकिरी. कसलीच काळजी चिंता नसते फकिराला. सुख काय आणि दुःख काय दोन्ही सारखीच. सुखांत आनंद नाहीं कीं दुःखांत विषाद नाहीं. सदैव शांत व आनंदी निष्पाप बालकाप्रमाणें. मायेच्या पाशांतून तो मुक्त झालेला असतो. ज्या चिरंजीव सुखासाठीं त्यानें अनेक वर्षे तपश्चर्या केलेली असते तें सुख, तो आनंद त्याला

मिळालेला असतो व तो सदैव त्यांतच गुंग होऊन रहातो. आपल्या व त्याच्या दृष्टींत महद्‌अंतर असतें. आपल्याला ही सृष्टी जशी दिसते तशी त्याला दिसत नाहीं; कारण आपण चष्मेवाले आहोंत. चष्मा लावूनच प्राणी जन्माला येतात. फकिरानें आपल्या डोळ्यांवरचा मायेचा चष्मा काढून टाकलेला असतो. त्यामुळें सगळ्या सृष्टींत त्याला सच्चिदानंद दिसत असतो. आपण प्राणी पहातो तेव्हां आपल्या डोळ्यांना त्याचा आकार, रंग वगैरे बहिरंग दिसतें. अंतरंग दिसत नाहीं. फकिराच्या डोळयांत क्ष किरणाचें वास्तव्य असतें, त्यामुळें तो अंतरंगाचा भेद घेऊं शकतो. त्याच्यासकट सर्वांच्या ठिकाणीं त्याला तो एकच एक दिसतो. स्वतः व इतर यांच्यामध्यें शरीरा-व्यतिरिक्त दुसरा कोणताहि भेद दिसत नाहीं. जें येथें तें तेथें; व जें तेथें तें येथें त्याच्या दृष्टीला पडतें. आंतर रुपानें तो सर्वांशीं एकजीव झालेला असतो. सर्वांच्या हृदयांत त्याला तो दिसतो. त्याच्या हृदयांत हाच असतो व इतरांच्या हृदयांतला तो हा हाच असतो. यामुळें सर्व भूतमात्रावर तो प्रेम करतो व सर्व भूतमात्रें त्याच्यावर प्रेम करतात. अशा फकिराच्या ठायीं दया, क्षमा, शांति असते म्हणून तेथें देवाची वस्ती असते. त्याची संपत्ती व वैभव ही दैवी असतात. तो गर्भश्रीमंत असतो. रामकृष्णादी वाडवडिलांचा वारसा त्याच्याकडे आलेला असतो. यामुळें ऐहिक संपत्तीचा वा वैभवाचा त्याला हव्यास नसतो. दैववशात मिळालेल्या संपत्तीचा व वैभवाचा तो भोग घेतो. पण अलिप्तपणें. त्यांत आसक्ती नसते. त्येन त्यक्तेन भुंजिथः ही त्याची दृष्टी असते. लोभ व तृष्णा त्याला नसतात. यामुळें संकटें व दुःखें तो आपल्यावर ओढवून घेत नाहीं. सर्व व्यवहार करून व संपत्ती वैभव व इतर भोग भोगूनही फकीर होतां येते. संपत्ती वैभवाचे भोग इंद्रियजन्य आहेत. तें इंद्रियाना, देहाला आपल्या बाह्यांगाला सुखवीत असले तरी अंतरंगाला हानिकारक आहेत. मानवी सर्व शक्तींचा उगम अंतरंगांत असल्यामुळें अशा भोगाचा लेप अंतरंगाला लागूं नये म्हणून अंतरंगांत तो संयम, विवेक, वैराग्य व अनासक्तीच्या भिंती उभारतो. असा हा जो फकीर तोच तो गीतेचा सिद्ध पुरुष, हाच सगळ्या जगावर राज्य करतो व खरें वैभव भोगतो. अव्वल बादशाही म्हणजे सच्चिदानंदाची बादशाही वैभव होय व हें फकिराला म्हणजे विवेक वैराग्याला मिळतें. म्हणून बाबा म्हणतात, फकिरी अव्वल बादशाही. खाइस्ट, बुद्ध, ज्ञानेश्वर, तुकाराम, साईबाबा, रामकृष्ण, विवेकानंद आदी सर्व संत हे जगाचे सम्राट आहेत व तेच जगावर राज्य करीत आहेत.

# बाबांनीं दाखविलेला साक्षात्काराचा मार्ग

लेखक : केशव कृष्ण प्रधान

**तुम्हांला देवाची भेट व्हावी, साक्षात्काराची अनुभूति व्हावी असें वाटतें ना? मग पुस्तकी पांडित्य उपयोगी पडणार नाहीं. त्यासाठीं सद्गुरुरायांचीच भेट घेतली पाहिजे. श्री साईबाबांनीं एका रूपकाच्या रूपानें साईसच्चरित् अध्याय बत्तिसावा यांत याचें स्पष्टीकरण कशारीतीनें केलें आहे, हें श्री. प्रधान यांनीं या लेखांत अधिकारवाणीनें दाखवून दिलें आहे. मुमुक्षूंनीं हा लेख वाचून त्यापासून योग्य तो बोध घ्यावा.**

साई सच्चरित अध्याय बत्तीसावा यांत श्रीसद्गुरु साईबाबांनी त्यांना स्वतःला साक्षात्काराचा अचूक मार्ग कसा सांपडला याचें कथांतरीत रूपक स्वरूपांत फारच रसभरीत आणि बहारीचें वर्णन केलें आहे. तो अध्याय जर आपण नीट वाचला तर त्यांतील खोल तत्त्वज्ञानाचा बोध आपल्याला झाल्याशिवाय रहात नाहीं. थोडक्यांत ती कथा खालीलप्रमाणें आहे—

एकदां श्रीसाईबाबा व त्यांचे तीन संवगडी असे चौघेजण एका घोर निर्जन अरण्यांत कसलातरी शोध लावण्यास निघाले. त्या ठिकाणीं जाऊन त्या वस्तूचा शोध लावण्याचा मार्ग, तसें म्हटलें तर त्या चौघांपैकी कोणालाच माहित नव्हता. अरण्य फार निबीड व घोर असून त्यांत मोठमोठाले जीर्ण वृक्ष व वेली वाढून त्यांनी आंत शिरण्याचा मार्ग बिकट करून टाकला होता. हिंस्त्र श्वापदें त्या घोर अरण्यांत इतस्थतः पसरली होती व जागोजागीं मार्ग सुधारण्याऐवजीं तो चुकण्याचा व खोल दरींत पडण्याचा संभव जास्त होता. शोध लावतां लावतां मध्यान्ह उलटून गेली व ते माथ्यावर आले. भगवान् सूर्यनारायण आपल्या प्रखर किरणांनीं त्या चौघांना क्लांत करून हैराण करूं लागले. तरी देखील त्या चौघांनीं आपला शोध लावण्याचें सोडलें नाहीं. खरें म्हटलें तर कोणीहि सूज्ञ माणूस अशा घोर अरण्यांत तेथील ठावठिकाणा जाणणारा, संकटें ओळखणारा व स्वतः न डगमगतां त्यांना त्यांच्या शोधाकडे नेणारा वाटाड्या प्रथमपासूनच बरोबर घेता. परंतु

ते सर्व चौघेजण आपल्या ज्ञानाची घमेंड बाळगून होते. जसें कांहीं आपणास तें अरण्य नवें नाहीं असें समजून वाटाड्याशिवायच निघाले होते. हा खरोखर त्यांचा मूर्खपणाच होता. त्या अरण्यांत वाटेंत त्यांना एक गरीब वंजारी भेटला. तो त्यांना कळकळीनें म्हणाला, "बाबांनो ! हें अरण्य फार घोर आहे. माझी झोपडी जवळच आहे तेथें चला. थोडा भाकरतुकडा खा, पाणी प्या व मग नंतर तुमच्या शोधाला लागा." त्या धूर्त वंजाऱ्याचा एक उद्देश होता तो असा कीं, त्याच्या झोपडींत नेहमींप्रमाणें लवकरच तें अरण्य पूर्णपणें जाणणारा एक श्रेष्ठप्रतीचा वाटाड्या येण्याची त्याची अपेक्षा होती. त्या वाटाड्याला या सर्वांचें जेवण झाल्यावर त्यांचेबरोबर देऊन त्यांचा मार्ग सुलभ करून द्यावा व ते शोधीत असलेला शोध त्यांना लावून द्यावा; परंतु या घमेंडानंदानीं त्यांचें म्हणणें मान्य केलें नाहीं. ते सर्वजण स्वतःला प्रबुद्ध, ज्ञानी असें समजत असत. पण वंजारी तर पडला अडाणी ! त्याचें न ऐकतांच हे चौघेजण पुन्हा त्या निबीड अरण्यांत शोध लावावयास शिरले. आतां दुपारचे दोन वाजले होते. सारखे फिरून फिरून तब्बल दोन तासांनीं श्रान्त झालेले ते परत त्या वंजाऱ्याच्या झोपडीपाशी येऊन पोहोंचले. त्या वंजाऱ्यानें दया येऊन पुन्हां त्यांना तीच विनंति केली. हा येवढा कळकळीनें सांगतो आहे तर आपण ह्याच्या घरीं भाकरतुकडा खाऊन व पाणी पिऊन थोडी विश्रांती घ्यावी, हा विचार येवढ्या वेळानें का होईना फक्त श्री साईमहाराजांच्या मनांत आला. बाकीचे तिघे वंजाऱ्याचे कांहीं न ऐकतां परत जंगलांत शोध करावयास निघून गेले. श्रीसाईमहाराज त्या झोपडीत भाकरतुकडा खाऊन पाणी पिऊन जरा विश्रांतीसाठीं थोडावेळ पहुडले. इतक्यांत तो वंजारी ज्याची वाट पहात होता तो श्रेष्ठ वाटाड्या त्या ठिकाणीं आला व त्यानें श्री साईमहाराजांना शोध लावण्याचें आश्वासन दिलें.

श्रीसाईमहाराजांची गोष्टींतून रुपकें सांगावयाची तसेंच द्वारकामाईंत त्यांचे दर्शन घेण्यास आलेल्या साधकांचा पूर्वइतिहास सांगावयाची हातोटी आपणास विदीतच आहे. यापुढें या गोष्टीचें रूपक जास्त स्पष्ट तऱ्हेनें आपणास विदीत होणार आहे. येथें प्रथमतः या वाटाड्याला श्रीगुरुराज या श्रेष्ठ संबोधनानें श्रीसाईमहाराजांनी वर्णिलें, नामिलें आहे. त्यावरून भोवतालचे भयानक निबिड अरण्य हे दुसरे तिसरे कांहीं नसून भ्रमांत सांपडलेल्या मानवाच्या भोवतालचे भवरूप संसाररूप जंगलच आहे हें वाचकांना समजून येईलच. या भयानक अरण्यांतून सुख-शांतीचा म्हणजे परमेश्वराकडे पोहोचण्याचा मार्ग व ठिकाण हे चौघे घमेंडानंद शोधीत होते हाच अर्थ स्पष्ट आहे व सद्‌गुरुशिवाय तो मार्ग व ठिकाण कसें सांपडत नाहीं ह्याचे सुंदर वर्णन पुढें येणार आहे. त्याआधी या चारांची विचारांची ठेवण कशी होती याचें श्रीसाईमहाराजांनी बहारीचें कथन केलें आहे ते आतां पाहूं; हे सर्व चौघेजण श्रीसाई-

महाराजांच्या भाषेंत कर्मठ, घनपाठी, विद्वत्तेची घमेंड असलेले, शब्दज्ञानाचा निव्वळ चावटपणा करून फक्त वादावादी करणारे होते. तरी देखील त्या प्रत्येकामध्यें पिंडापिंडामध्यें फरक होता. निव्वळ शाब्दिक ज्ञानामध्यें अतिविस्तीर्ण आणि निबिड अशा घनदाट कीं जेथें सूर्यप्रकाश देखील आंतमध्यें येत नाहीं, अशा अरण्यांत शोध लावणें हें अशक्य काम होतें. परंतु प्रत्येकाला असे वाटे की, माझ्या ज्ञानाच्या योगाने देव कोठें रहातो, त्याच्याकडे जाण्याची वाट कुठली, त्याचा मी शोध लावीन. परंतु नुसती पोथीपुस्तकें, पुराणें वाचून व पुस्तकी ज्ञानसंपन्न होऊन, ब्रह्मनिरुपण करून हा शोध लागत नाहीं हें त्यांना माहित नव्हते व समजून घेण्याची इच्छाहि नव्हती.

त्यांतील एकजण असें समजत होता कीं, परमेश्वराचा मार्ग गीतेंत सांगितल्या-प्रमाणें फक्त 'उद्धरेत आत्म नात्मानं' या वचनाप्रमाणेंच आहे; म्हणजे आपणच परमेश्वराचा शोध लावावयाचा असतो. तेथें परावलंबन सर्वथैव अयुक्त असते. म्हणून गीतेंत श्रीभगवंतांनीं गुरूची परमेश्वरी ज्ञानाकरितां मुळींच जरूरी नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. यावर त्यांच्यांतील दुसरा एकजण म्हणतो कीं, तूं म्हणतोस ते खरें आहे. परंतु प्रथमतः आपल्याला मन 'संकल्प' 'विकल्प' यांतून मुक्त करण्यास शिकलें पाहिजे. चित्तवृत्तीचा निरोध झाला कीं, परमेश्वर प्राप्त होण्यास कितीसा वेळ लागणार ? मन संकल्पविकल्पशून्य करावयास आपणच आपले शिकूं या; यासाठीं गुरूची काय जरूरी आहे ? त्यावर तिसरा उद्‌गारला, जितकें म्हणून सविकार आहे तितकें सर्व अनित्य आहेत. निर्विकारच फक्त नित्य आहेत. व त्यासच देव म्हणतात. तेव्हां आपल्याला सतत नित्य, अनित्य ह्याचा विचार करण्याची फारच आवश्यकता आहे व तो विचार आपला आपणच करावयाचा आहे.

श्रीसाईबाबा मात्र नेहमीं त्या तिघांस म्हणत असत कीं, पुस्तकी ज्ञानांत कांहींच अर्थ नाहीं. विहीत आचरण करून मोठ्या आदरानें काया, वाचा आणि पंचप्राण गुरुचरणीं समर्पण केल्याशिवाय आपल्याला परमेश्वराचें ज्ञान होणार नाहीं. परंतु 'संगती संग दोषः' यामुळें म्हणा किंवा त्या तिन्ही गृहस्थांना योग्य धडा मिळावा म्हणून म्हणा, ते जसे सांगत तसे श्रीसाईबाबा न बोलतां ऐकून घेत व वागत. म्हणूनच ते निबीड जंगल दोनदा पायाखालीं घालूनसुद्धां मार्ग सांपडत नाहीं हा अनुभव त्या तिघांस देऊन त्या जंगलाची पुरेपूर माहिती असलेला वाटाड्या बरोबर घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं ही गोष्ट त्या तिघांच्या निदर्शनास श्रीसाईबाबांनीं आणून दिली. परंतु पंडिती हटवादीपणामुळें अजूनही त्या तिघांच्यांतील अहंभावाची मस्ती पुरेपूर उतरली नव्हती. ते त्या श्रेष्ठ वाटाड्याकडे न बघतां थोडी विश्रांति घेऊन पुन्हां त्या घोर जंगलांत शोध लावावयास तसेच शिरले. श्रीसाईबाबांना मात्र त्या दयाळू श्रेष्ठ वाटाड्यानें प्रेमानें आपल्या बरोबर घेऊन योग्य तोच मार्ग दाखवून कृतार्थ कसें

'कल याच रूपकात्मक वर्णन आपण त्यांच्याच भाषेंत वाचून मग समजावून घेऊंया. त्या श्रेष्ठ वाटाड्यानें त्यांना—

नेलें एका विहिरीवर । दोन्ही पायास बांधिला दोर ।
वरती पाय खालती शिर । पाण्याबरोबर सोडिला ॥ ६९ ॥

पाण्यास पोंहचूं नयेत हात । पाणीही जाऊं नये मुखांत ।
ऐसे मज अलगत लोंबत । सोडिलें विहिरींत गुरुरायें ॥ ७० ॥

झाड होतें कांठीं एक । तयांस दोरीचे दुसरें टोंक ।
बांधून गेले गुरुराय निःशंक । कोणा न ठाऊक कोठें ते ॥ ७१ ॥

'नाथाच्या घरची उलटीच खूण' अशा अर्थाच्या वरील ओव्या सूज्ञ वाचकास परमेश्वराचा मार्ग पुस्तकी ज्ञानांतून नसून सजीव गुरूनें जीवन इच्छेंतून देण्यांत आहे हे जाणलें असेलच. तेव्हां जरी—

जरी वेदवेदाङ्गअध्ययन । केलें श्रुतिशास्त्रपारायण ।
गुरुकृपेवीण नाहीं ज्ञान । इतर तो शीण केवळ ॥ १७ ॥


गुरु परमात्मा चराचर । भरला असे सबाह्याभ्यंतर ।
ऐसा व्हावया निजनिर्धार । निष्ठा अपार आवश्यक ॥ ४२ ॥

अनागमज्ञ केवळ तार्किक । वादोन्मुख आणि चिकित्सक ।
तयां न स्वप्नींही ज्ञानसम्यक । शुद्ध भाविक पाहिजे ॥ ४३ ॥

वरील ओव्यांवरून गुरूची जरुरी व गुरुवरील श्रद्धा ह्यांची परमेश्वर प्राप्तीकरितां किती जरूरी आहे, हें आपणांस स्पष्ट शब्दांत श्रीसाईबाबांनीं विदित केलें आहे. इतकेच नव्हे तर तोच परमेश्वर प्राप्तीचा एकमेव मार्ग आहे असे श्री साईबाबांचे ठाम मत होते हें ह्या विवेचनावरून स्पष्टच होईल.

हा लेख लिहिण्यास कारण कीं, या बुद्धीयुगामध्यें पुस्तकी ज्ञानाला फारच मान असल्याकारणानें अत्यंत गाढे पंडित असल्या पुस्तकी ज्ञानाच्या प्रभावानें बहुजन समाजाची परमेश्वरावरील निष्ठा मुळातच डावलूं पहात आहेत, तेव्हां सद्गुरु व त्यावरील अपार श्रद्धा हे विषय केवळ हास्यास्पद करण्याचा त्यांचा प्रयत्न ह्या युगाला साजेसाच आहे व त्यांत पाश्चिमात्य संस्कृतीच्या परिणामामुळें विज्ञानशास्त्रानें जेवढें ज्ञान केवळ 'चक्षुर्वैसत्यं' ज्ञानापलीकडे दिलें आहे तेवढेंच खरें मानण्याचा प्रघात

पाडीत आहेत. तर आमचे शास्त्रीपंडित वेदांत, श्रुतीस्मृति, पुराणें यांची निव्वळ पोपटपंची करून आपल्या अध्यात्मिक विद्वत्तेनें बहुजन समाजाला दिपवून टाकीत आहेत व या सर्व अध्यात्मिक शास्त्रांचा अभ्यास केल्यास हमखास परमेश्वराचा साक्षात्कार होतो असा भास निर्माण करीत आहेत. याचा अर्थ ते खऱ्याखुऱ्या सत्पुरुषांची स्तुति करीत नाहींत असाही नाहीं व गरज नाहीं असाही नाहीं, तरी देखील त्यांच्या प्रवचनामुळें विज्ञानाकडे ओढला जाणारा आमचा बहुजन समाज योग्य मार्गदर्शनाच्या अभावीं निव्वळ करमणूक म्हणूनच अशा प्रवचनांना जमा होत आहे. वरील लेखानें जो खऱ्याखुऱ्या सद्गुरूचा शोध करून घेऊन बुवाबाजीपासून स्वतःचें संरक्षण करून घेईल व श्रीसाईबाबांच्या वरील कथेंतील अर्थ नीट समजावून घेऊन त्याप्रमाणें मार्ग चोखाळील त्याचें किती हित होईल, याचा वाचकांस बोध होईल.




## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी–किंमत टपाल खर्चासह ( स्टँप–तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

# आसरा संतांचा

लेखक : द. मो. चित्रे

**संत-वाङ्मय हें दुःखी मनाचें सांत्वन करून दिलासा देणारें असतें. त्याच्या सहवासांत सतत रहाणाऱ्याला दुःखावर विजय मिळवितां येतो. त्या दृष्टीनें तुकोबारायाच्या वाङ्मयाचे एकनिष्ठ उपासक श्री. चित्रे यांनीं तुकोबांच्या अभंगवाणीकडे या लेखाच्याद्वारें वाचकांचें लक्ष वेधविलें आहे.**

जीवनांत असे कांहीं क्षण व प्रसंग उद्‌भवतात कीं त्यावेळीं संतवाङ्मयच मनाचें सांत्वन करूं शकतें.

पंजाबचे भूतपूर्व राज्यपाल, पुणें विद्यापीठाचे माजी कुलगुरु व मराठी साहित्य परिषदेनें आयोजित केलेल्या एका संमेलनाचे अध्यक्ष कै. डॉ. न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ यांच्यावर एकाएकी आकाश कोसळलें. कै. काकासाहेब गाडगीळ कामानिमित्त दिल्लीस गेले असतांना त्यांची प्रिय पत्नी स्टोव्हच्या ज्वालांनीं ग्रासली गेली. त्यांना तावडतोब ससून हॉस्पिटलमध्यें उपचारार्थ नेण्यांत आलें. तेथील डॉक्टरांनीं वैद्यकीय उपचारांची पराकाष्ठा केली, पण मानवी प्रयत्न यमापुढें थिटे पडले. श्री. काकासाहेबांच्यावर आकाश कोसळलें.

मी ती दुःखद वार्ता वर्तमानपत्रांत वाचली. श्री. काकासाहेब यांचें सांत्वन कसें व कोणत्या शब्दांनीं करावें हें सुचेना. मी संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज यांची गाथा उघडली व वाचन सुरू केलें. मला पुढील अभंग आढळला.

“ जन्ममरणांची कायसी चिंता। तुझ्या शरणागतां पंढरीराया॥ १ ॥ ध्रु० ॥ वदनीं तुझें नाम अमृत संजीवनी। असतां चक्रपाणी भय कवणा ॥६॥ हृदयीं तुझें रूप बिंबले साकार। तेथें कोण पार संसाराचा ॥२॥ तुका म्हणे तुझ्या चरणांची घाखर। असतां कळिकाळ पायां तळीं ॥ ३ ॥ नंतर दुसरा अभंग आढळला.

जो भक्तांचा विसावा। उभा पाचारितो धांवा ॥ १ ॥ ध्रु० ॥ हातीं प्रेमाचें भातुकें। मुखीं घाली कवतुकें। भवसिंधू सुखे। उतरी कासे लावूनी ॥ ६ ॥ थोर

भक्तांची आस । पाहे भोंवताली वास ॥ २॥ तुका म्हणे कृपादानी। फेडी आवडीची धणी ॥ ३ ॥

मीं हे दोन्ही अभंग डॉ. न. वि. गाडगीळ यांच्याकडे पोष्टानें पाठविले. उत्तरांत ते लिहितात—

" विनंती विशेष.

दिनांक २१-१२-६५ चे पत्र मिळालें. आपल्या अभंगानें समाधान वाटले. पत्राबद्दल आभार.

आपला,

**न. वि. गाडगीळ**

श्री तुकाराम महाराजांनीं अभंगांत म्हटल्याप्रमाणें मरणाचें भय कोणाला? ज्या ठिकाणीं पांडुरंगाच्या चरणांची पाखर आहे त्या ठिकाणी अभयदान आहे, समाधान आहे.

श्री तुकाराम महाराजांची गाथा म्हणजे अमोल धनाचें एक भांडार आहे. आपल्याला पाहिजे तो 'माल' घेऊन याचक बाहेर पडेल. संतसमागमासंबंधीं श्री तुकाराम महाराज काय म्हणतात पहा.

" दसरा दिवाळी तोचि आम्हां सण। सखे संतजन भेटतील ॥ १ ॥ धृ० ॥ आमुप जोडल्या सुखाचिया राशी। पार या भाग्यासी न दिसे आतां ॥ ६ ॥ धन्य दिवस आजि आला सोनियाचा। पिकली रे वाचा रामनामें ॥ २ ॥ तुका म्हणे काय होऊं उतराई। जीव ठेवूं पायीं संताचिये ॥ ३ ॥ आपली दसरा दिवाळीसंबंधीची कल्पना व संतांची कल्पना यांत केवढें महदंतर आहे! रामनामाचा गजर म्हणजेच संतांचें मिष्टान्न! या रामनामाच्या गजराबरोबर "जें कां रंजलें गांजलें। त्यासि म्हणे जो आपलें ॥ १ ॥" हें श्री. तुकाराम महाराजांचें समाजकार्याचें प्रमुख सूत्र आहे.

भोंदू माणसासंबंधीं श्रीतुकाराम महाराज म्हणतात, "टिळा टोपी उंच दावी। जगीं मी एक गोसावी ॥ १ ॥ धृ० ॥ अवघा वरपंग सारा। पोटीं विषयांचा थारा ॥ ६ ॥ मुद्रा लावितां कोरोनि। मान व्हावयास जनीं ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसे किती। नरका गेले पुढें जाती ॥ ३ ॥ ढोंगी कृत्यांची श्रीतुकाराम महाराजांना मनस्वी चीड होती. आणि म्हणून अशी शापवाणी बाहेर पडली.

" बाळेंविण माय क्षणभरहि न राहे। न देखितां होय कासाविस ॥ १ ॥ धृ० ॥ आणिक उदंड बुझाविती जरी। छंद त्या अंतरीं माऊलीचा ॥ ६ ॥ नावडती बोल

तया आणिकाचे । देखोनियां नाचे माय दृष्टी ॥ २ ॥ तुका म्हणे विठ्ठल माझी माऊली । आणिकांचे बोली चाड नाहीं. ॥ ३ ॥" मातृप्रेमाची ओढ कशी असते याचें हें सुंदर वर्णन आहे.

सर्वव्यापी परमेश्वराचें स्वरूप श्रीतुकाराम महाराजांनीं कसें दाखविलें आहे ? "चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलविते हरीविण ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ देखवी दाखवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥ ६ ॥ मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनियां ॥ २ ॥ वृक्षाचेंही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥ ३ ॥ तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तयां उणें कांहीं चराचरीं ॥ ४ ॥

द्रव्यार्जनासाठीं उत्तम व्यवहार करावा असे श्री तुकाराम महाराज म्हणतात.

"जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारें वेच करी ॥ धृ० ॥ उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ॥ २ ॥ परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया बहिणी माया । भूतदया गाईपशूचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥ ३ ॥ शांतिरुपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचें ॥ ४ ॥ तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचे ॥ ५ ॥

गृहस्थाश्रमिवासियांनीं कसें आचरण ठेवावें व द्रव्य कसें संपादन करावें या संबंधीं श्री तुकाराम महाराजांनी किती उत्तम मार्गदर्शन केलें आहे ?

मी वर म्हटल्याप्रमाणें श्री तुकाराम महाराजांची गाथा म्हणजे एक विराट खजिना आहे, अनुभवी बोलांचा विशाल सांठा आहे. हर्ष, शोक, नैराश्य, विषाद, अगतिकता कोणताही प्रसंग येवो गाथा तुमचें समाधान करावयास तत्पर आहे. फक्त गरज आहे आसन्यासाठीं जाण्याची.

For peace of mind, turn to Saintty literature, oh man ! and for guidance also.



# श्री साईबाबा हीच आमची माऊली

लेखक : डॉ. के. भ. गव्हाणकर

श्री साई ही सर्वांची माऊली आहे. माऊली हा शब्दच प्रियतेच्या क्रियेचा मुकूट आहे. 'मुकूट' हें विशेषणसुद्धां माऊली शब्दाला पुरत नाहीं. कारण मुकूट पहाणारा त्याहून निराळा राहतो. ज्या प्रियतेला पाहतांच—तिचें स्मरण होतांच—मीपण उरत नाहीं, तो हरून जातो तो शब्दच माऊली उच्चार, आई ह्या वचनापेक्षां अधिक गोड आहे. आई हा शब्द क्रियारूप प्रियतेला आहे. जेथें मीपणा प्रियतेंत बुडून केवळ स्वप्रियप्रतीतीच उरते तो प्रियतेचा उच्चार माऊली श्री साई. श्री साई माऊली ही अत्यंत श्रीमंत आहे. बाकीचे श्रीमंत इतरांवर टिकलेले आणि त्यांनीं आपलें घरदार, द्रव्य दुसऱ्याला द्यावयाचें म्हटलें तर तें स्वतः दरिद्री व्हावयाचे. ती साई माऊली त्या जातीची श्रीमंत नाहीं. ती स्वयंभू, स्वतःमध्येंच व्यक्त व्हावयाची, इतरांकडून मिळवावयाची नव्हे. उलट वाढतच राहील. शक्तिवानाचें स्मरण करून आपणाला शक्ति येईल कां? पण श्री साई माऊलीच्या स्मरणानें जीव सहज माऊलीरूप होतो. म्हणजे निजज्ञानच माऊली होऊन भेटते. ज्ञान हें नेहमीं कर्माशीं तादात्म्य पावतें. तेंच निजज्ञानाचे निरीक्षण करूं लागलें म्हणजे स्वप्रेमाकडे वळलें म्हणून समजावें. "निरखित निरखित गेलिये। पाहे तव तन्मयाचि झालिये गो ॥

बाळाला पाहातांच म्हणजे त्याचें दर्शन होतांच त्याला पाहणारी त्याची आई स्त्री उरत नाहीं, कोणाची कन्या असत नाहीं, ती त्यावेळीं कोणाची कोणीही असत नाहीं. केवळ ती प्रियप्रतीतीरूप होते. हें तिचें मातृत्व होय. त्याप्रमाणें श्री साईंचा आठव आपलें जगताशीं तादात्म्य करणारे ज्ञान प्रियतेंत हरवून नेतें. आपलें ज्ञान माऊलीरूप होतें, तें इतर कोणाचेंही असत नाहीं, उरत नाहीं. श्री साईबाबा हे अवतारी पुरुष होते, अयोनीज व आजानबाहु होते (देहानें—अर्थात ते अद्याप हयात आहेत व भक्ताला दर्शन देतात.) ते संत होते. संत हे शास्त्रांतील विधीनिषेधाचे कक्षेतून बाहेर गेलेले असूं शकतात. कौशीतकी उपनिषदांत म्हटल्याप्रमाणें, ज्याला परमतत्व प्राप्त झालें आहे, तो सर्व नियमांच्या पलीकडे गेलेला असतो. अशा तत्त्वज्ञानी त्यानें पूर्वी केलेल्या (पूर्व) कर्मांच्या बंधनांतून मुक्त झालेला असतो. फार कशाला !

अशा पुरुषाची इच्छा व शक्ति म्हणजे भगवंताची इच्छा व शक्ति होय. हें संत जीवनांतील वैशिष्ठ्य होय.

एका संतकवीनें म्हटल्याप्रमाणें वस्तुतः मंदिरें व मशिदा ही परमेश्वराच्या रस्त्याला झांकणारी स्थळें आहेत व गुरु व मुर्षिद हे दरवाजावर उभे असून एक-प्रकारचा प्रतिबंध करीत असतात व परमेश्वराच्या स्थळाला पुराणें, कुराण, तस्बीह, माला ही जणूंकाय एकप्रकारची कुलुपेंच आहेत. परंतु परमेश्वराशी एक झालेला संत हा सर्वांनाच परमेश्वराप्रत नेणारा असतो. असे या संताचे लक्षण आहे. या दृष्टीनें साईबाबांच्या चरित्राकडे पाहिले पाहिजे.

संतांच्या स्वभावांत भिन्नता असणें सहाजिक आहे. जो संत ज्या देशांत, ज्या परिस्थितींत, ज्या दिक्षेमध्यें अथवा वातावरणांत प्रकट होतो, अगर राहतो; त्याचा स्वभाव प्रायः त्याप्रमाणेंच बनतो. तसेंच कित्येक संत एकांतसेवी होऊन लोकसमुदाय सोडून अलग राहातात. कित्येक रात्रंदिवस लोकांत वावरत राहून त्यांना सहाय्य करतात व त्यांना मार्गदर्शक होतात. ते अन्याय, अत्याचार यांना तोंड देऊन सत्यधर्म स्थापन करण्याचे कामीं गुंतलेले असतात. एतावतः संत निरनिराळ्या स्वभावांचें असणें सहाजिक आहे व त्यांच्यांत वैचित्र्य असणें हेंहि सहाजिक आहे. अशा तऱ्हेचे अनेक मार्गांतील संत सर्व देशांत, सर्व जातींत, सर्व धर्मांत अगर सर्व सांप्रदायांत नेहमींच आढळतात. साखर कोणत्याहि पदार्थांत, कोणत्याहि रूपानें असली तरी ती आपले गोडपण कायमच राखते. त्याप्रमाणें कांहीं संत निवृत्तीपर, कांहीं प्रवृत्तिपर असतात. कांहीं अवधूत वृत्तीचे असतात, तरी त्यांचे मार्गदर्शकत्व कायमच असते.

अवधूत वृत्तीच्या संताचे बाह्य आचरण बाल, जड, उन्मत्त किंवा पिशाच्चवत् असें होत असतें, असें मानण्यांत येतें. हे लोकांस प्रत्यक्ष उपदेश करीत नाहींत; अगर दीक्षा देत नाहींत. ते आपल्या ठायींच गुंग अथवा रममाण होऊनच जगतास एक प्रकारचे मार्गदर्शक असतात. परंतु त्यांच्या सान्निध्याच्या योगायोगानेंच लोकांचे अपार कल्याण होत असतें. अशा या तिन्ही मार्गांतील विभूती, महाराष्ट्रांतही पुष्कळ होऊन गेल्या आहेत. श्री ज्ञानेश्वर, रामदास, मोरयागोसावी, अक्कलकोटचे स्वामी, वगैरे अनेक नांवांचा निर्देश करतां येईल. अर्थात् अनेक पाखंडी लोक यांच्याविषयीं अनेक कुकल्पना करीत असतात. त्यांचा त्याग विचाराने केला पाहिजे.

श्री साईबाबा हे पूर्णकोटींतील अवतार-संत आहेत. त्यांनीं अनेक चमत्कार केलेले विश्वसनीय रीतीनें माहीत असल्यामुळें आपल्याला खात्रीनें ते विचारांत घेतले पाहिजेत. संताचे हातून चमत्कार होतात याचें कारण असें आहे कीं, त्यांचे अंगीं

अहिंसा, सत्य इत्यादि यमनियम पूर्णपणें बाणलेले असतात. त्यामुळें ते ईश्वररूपांत स्थित झालेले असतात. व म्हणून संतांचे चरित्रांत अलौकिक अशी ईश्वरीकृती आढळणें यांत नवल नाहीं. खुद्द भगवानांनीं गीतेंत आपल्या योगमायेस "ऐश्वर्य योग" असें म्हटलें आहे. म्हणून संतांचे ठिकाणींहि अनेक सिद्धी असल्यामुळें त्यांचे हातून चमत्कार होतात. हा त्यांचा अधिकार आहे.

जगामध्यें कित्येक दांभिक व धूर्त पाखंडी लोक स्वार्थ साधण्यासाठीं या सिद्धीसामर्थ्यांची नक्कल करीत असतात व लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकून आपला नीच स्वार्थी व्यवसाय चालवीत असतात. अशा तऱ्हेचें दांभिक, स्वार्थी, बेगडी संत सत्पुरुषाच्यापासून अगदीं निराळे आहेत. वर सांगितल्याप्रमाणें श्रीसाईबाबां-सारख्या महाविभूती परमेश्वराशीं एकात्मभाव पावलेल्या असतात. याच दृष्टीनें बाबांच्या चमत्कृतीविषयीं विचार केला पाहिजे. थोडक्यांत साईबाबा हाच चमत्कार आहे.

संतांच्या ठिकाणीं समता हा एक मुख्य गुण आहे म्हणून आपले कल्याणासाठीं या संतभावाची प्राप्ती करणें हे प्रत्येकाचें कर्तव्य आहे व त्यांची अनेक साधनें आहेत. भक्तिप्रधान ग्रंथांत त्यांचे उल्लेख आलेले आहेत. श्रीसाईबाबांचें जीवन चरित्रासारखें चरित्र हें ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें मार्गदर्शकच आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत वर्णन केलेले स्थितप्रज्ञ गुणातीत किंवा श्रेष्ठ भगवद्भक्त म्हणजेच संत होत. भगवद्गीतेंत सांगितलेल्या संताच्या लक्षणापैकीं अनेक लक्षणें श्रीसाईबाबांच्या चरित्रांत दिसतात. तुकाराममहाराजांनीं म्हटल्याप्रमाणें "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारें।" ही उक्ती बाबांविषयीं लागू पडणार नाहीं असें कोण म्हणेल? "शिरडीचे साईबाबा" हा ग्रंथ अवश्य वाचा. म्हणजे "बाबा" काय चीज आहे तें कळेल.

संत म्हणजे सत्पुरुष होत. भर्तृहरीनें एके ठिकाणीं सत्पुरुषाची व्याख्या केली आहे. "एके सत्पुरुषाः परार्थ–घटकाः स्वार्थं परित्यज्यये." याप्रमाणें स्वार्थत्याग करून ते केवळ परोपकाराकरितां राहिलेले असतात. तेच सत्पुरुष म्हणजे संत होत; अशी या संतपदांची व्याख्या होईल व श्रीसाईबाबांचे जीवन स्वतःकरितां होतें, तें 'परोपकारार्थ' नव्हतें असें कोणासही म्हणतां येणार नाहीं.

तसेंच अनपेक्षता, किंवा निरपेक्षता, भगवत् परायणता, समदृष्टी, निर्ममत्व, निष्परिग्रह, वगैरे अनेक संतांचे गुण आहेत व या दृष्टीनें श्रीसाईबाबांच्या चरित्राचा विचार केला म्हणजे बाबा श्रेष्ठ अवर्णनीय सत्पुरुष किंवा संत होते असेंच ठरतें.

संताचे स्थान म्हणजे एक पवित्र स्थळ होय. तें पावन करणारें असतें व या न्यायानें साईबाबांची शिर्डी हें स्थान एक पवित्र क्षेत्र आहे; असें मानणें क्रमप्राप्तच आहे व अशीं क्षेत्रें हीं पवित्र म्हणजे पावन करणारीं आहेत. त्या स्थळांची जपणूक करून, त्यांची महती वाढवणें व तीं आपल्या आचरणानें पवित्र–स्वच्छ–ठेवणें ही एकप्रकारची भक्तिच होय.

श्री साईबाबांनी १९१८ विजयादशमी रोजीं महासमाधि घेतली, तरीदेखील निस्सीम भक्तांना ते आजही आपल्या सगुण तेजोदर्शनाचा आनंद देत आहेत. पण प्रत्यक्ष भगवंत प्रकट झाले तरी अंतःकरण निर्मळ· व पवित्र असेल तरच आनंद प्राप्त होऊं शकतो. विस्मितता, चकित स्थिती कांहीं कालपर्यंत जरी झाली तरी शुद्ध संस्कार असले तरच त्याचा उपयोग होऊं शकतो. आणि 'शिर्डी क्षेत्र' व 'श्री साई'नाम हीं दोन साधनें श्री साईभगवंताचे दिव्य तेजोमय दर्शन साक्षात्कार देण्यास समर्थ आहेत.

हे वृक्षांनो ! तुम्हांला टवटवीचा, हिरवेपणाचा, पुष्पफलांचा साक्षात्कार केव्हां होतो ? वसंताचे आगमनाबरोबर. त्याचप्रमाणें अंतःप्राणांत चैतन्यवसंताचा आविर्भाव होण्याबरोबर भक्तरूपी वृक्ष फलसंपन्न व प्रेमसंपन्न होतात. निस्सीम प्रेमांत हें भाग्य प्रकटतें. म्हणून साधनें स्वच्छ व शुद्ध ठेवण्याची खबरदारी प्रत्येक मुमुक्षूंनीं घेतली पाहिजे.



# साहित्य-समालोचन

## श्री तुकाराम महाराज

श्री तुकाराम महाराजांच्या अभंगांची छंदबद्ध गाथा. भाग पहिला. संग्राहक–रामदास कृष्ण धोंगडे. प्रकाशक–संतसेवा प्रकाशन, १८८, प्रतापगड पेठ, सातारा. किंमत ( कागदी कव्हर ) सव्वादोन रुपये.

श्री. धोंगडे यांनीं श्री तुकाराम महाराजांच्या अभंगांचें एकत्रिकरण, वर्गीकरण नि संशोधन भक्तिभावपूर्वक व मोठ्या आस्थेनें चालविलें असून सुमारें साडेनऊशें अभंगांचा हा पहिला भाग त्यांनीं प्रसिद्ध केला आहे. अशा रीतीनें दहा भागांत सुमारें दहा हजार अभंगांचा संग्रह करण्याचा त्यांचा विचार आहे. ह. भ. प. दांडेकर यांनीं म्हटल्याप्रमाणें त्यांचा हा प्रयत्न खरोखर स्तुत्य आहे. हा एक महाउद्योग; परंतु तो अत्यंत उपयुक्त व स्वागतार्ह आहे, त्यांना त्याबाबतींत जरूर तें आर्थिक पाठबळ मात्र वेळोवेळीं मिळत गेलें पाहिजे. त्याच्या अभावी त्यांचा उत्साह कितीही दांडगा असला तरी त्याला ओहोटी लागल्याशिवाय रहाणार नाहीं.

प्रस्तुत पुस्तकाचीं विषयानुरोधानें ३४ प्रकरणें पाडण्यांत आलीं आहेत. विषयानुरोधानें म्हणजे रूप या प्रकरणांत रूपासंबंधीं तुकाराम महाराजांनीं रचलेले अभंग, ध्यान या सदराखालीं त्यांनीं रचलेले ध्यानासंबंधीं अभंग. त्यामुळें वाचकांची फार चांगली सोय झालेली आहे.

प्रस्तुत पुस्तकास संग्राहक श्री. धोंडगे यांनीं तुकोबारायांच्या अभंग-प्रकाशनाचा व आजवर कोणी कोणी कसकसे प्रयत्न केले व आपल्या प्रयत्नाचें स्वरूप काय आहे याची बरोबर कल्पना करून देणारी दीर्घ व माहितीपूर्ण प्रस्तावना जोडली आहे.

तुकोबारायांच्या अभंगांचें महात्म्य काय वर्णन करून सांगायचें आहे ? तें आजच्या काळांत प्रत्येकजण जाणतोच.

श्री. धोंडगे यांच्या या उपयुक्त प्रयत्नास निदान ग्रंथाची एकेक प्रत विकत घेण्याच्या दृष्टीनें तरी प्रत्येकानें हातभार लावणें जरूर आहे.

## महाराष्ट्रांतील महागणपति

लेखक : सदानंद चेंदवणकर; प्रकाशक : निर्णयसागर प्रेस, २६–२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २, किंमत सव्वादोन रु. पृष्ठें–१३६.

महाराष्ट्र ही अनेक जागृत गणेश देवतांनीं गजबजलेली पुण्यभूमि आहे. श्री. चेंदवणकर यानीं महाराष्ट्रांतील ठिकठिकाणच्या अष्टविनायकांची माहिती करून देणारी पुस्तिका यापूर्वीच प्रसिद्ध केलेली आहे. आणि आतां महाराष्ट्रांतील चौदा सुविख्यात गणेशक्षेत्रांची सचित्र व विस्तृत माहिती करून देण्यासाठीं ते पुढें सरसावले आहेत. टिटवाळा, चिंचवड, गणपतीपुळें, नांदगांव, अणजूर, राजूर वगैरे ठिकाणीं जी गणेश मंदिरें आहेत, त्या प्रत्येक स्थळामागें नि मूर्तीमागें कांहीं ना कांहीं प्राचीन इतिहास, दंतकथा वगैरे आहेतच. त्या कथा विशेषतः गणेश भक्तांना रंजक नि उद्बोधक वाटल्याशिवाय राहाणार नाहींत. लेखकानें त्या सर्व प्रयत्नेकरून मिळवून या पुस्तकांत सुलभ भाषेंत टिपल्या आहेत. त्या त्या स्थानांतील गणेशमूर्तींची छाया-चित्रेंही देण्यांत आलीं आहेत.

प्रत्येक गणेशक्षेत्रामागें कांहीं ना कांहीं इतिहास असतोच. उदाहरणार्थ आपण आजकाल ज्या स्थानाकडे गणेशभक्तांची विशेष मोठ्या प्रमाणांत वर्दळ होऊं लागली आहे असें मुंबईपासून नजिक असलेलें टिटवाळ्याचें गणेशक्षेत्र घेऊं या. क्षेत्रासंबंधीचा पूर्वेतिहास, पौराणिक दंतकथा, पेशवेकाळापासून तों आतांपर्यंत या देवस्थानाची कसकशी उत्क्रांति होत गेली, आज तेथें व परिसरांत काय चाललें आहे, पुजाअर्चा, नित्यनैमित्तिक उत्सव, जाण्याचे मार्ग वगैरे भक्तांच्या दृष्टीनें जें जें आवश्यक तें सब कुछ या पुस्तकांत देण्यांत आलें आहे. त्यामुळें तिकडे जाणाऱ्यांचें योग्य प्रकारें मार्गदर्शन होणें सहाजिक आहे.

अशा रीतीनें एकंदर चौदा गणेशक्षेत्रांची माहिती या ग्रंथामुळें उपलब्ध होण्याची सोय झालेली आहे.

निर्णयसागर प्रेसनें या माहितीपूर्ण पुस्तकाचें प्रकाशन आपल्या नेहमींच्या लौकिकास साजेशा सुंदर स्वरूपांत करून गणेशभक्तांची उत्तमप्रकारें सोय केली आहे.

★

## पोंच—

**सद्गुरूच्या शोधार्थ :** लेखक : केशव कृष्ण प्रधान.

**सुबोध गीता :** लेखक कै. शामराव विनायक देशपांडे.

**भारतीय सणांचा इतिहास :** लेखक : सदानंद चेंदवणकर.

या पुस्तकांचें समालोचन क्रमशः या पुढील अंकांत.

———

# संतांचा प्रसाद

—संत विनोबा

**विनोबा भावे यानीं संत तुकाराम महाराज यांच्या कांहीं निवडक नि प्रत्येकाच्या जीवनांत उपयोगी पडणाऱ्या अशा अभंगांचें सुलभ नि गोड भाषेंत निरूपण केलें असून, तो 'प्रसाद' प्रत्येकानें ग्रहण करण्यासारखा आहे.**

—संपादक

नाम-संकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥ १ ॥
न लगती सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥ २ ॥
ठाईं च बैसोनि करा एक-चित्त । आवडी अनंत आळवावा ॥ ३ ॥
राम कृष्ण हरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥
याविण आणिक असतां साधन । वाहतसे आण विठोबाची ॥ ५ ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनी । शहाणा तो धनी घेतो येथें ॥ ६ ॥

नाम-स्मरण हें सोपें साधन आहे. आणि जन्मजन्मांतरांतलीं सर्व पापें भस्म करण्याचें त्यांत सामर्थ्य आहे. त्याला कांहीं सायास लागत नाहींत कीं कोठें जावें-यावें लागत नाहीं. घरबसल्या नारायण चालून येतो. एके ठिकाणीं बसून चित्त एकाग्र करावें आणि प्रेमाच्या जिव्हाळ्यानें प्रभूला आळवावें. ईश्वराच्या अनंत नामांचा सर्वकाळ ध्यास घ्यावा. ह्याशिवाय दुसरें साधन नाहीं, हें मी—तुकाराम महाराज म्हणतात—विठोबाची शपथ घेऊन सांगतों सर्व साधनांपेक्षां हें सोपें आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन शाहणा मनुष्य नाम-सुखाचा लाभ घेतो.

तुकाराम महाराजांच्या साधनपर अभंगांपैकीं हा एक निकराचा अभंग आहे. उपास्य देवतेची शपथ घेऊन महाराजांनीं ह्यांत प्रतिज्ञा मांडली आहे.

ह्यांत खालील विधानें आहेत:—

( १ ) नाम-स्मरण हें सोपें साधन आहे.

‘ नाम घेतां न लगे मोल । नाम मंत्र नाहीं खोल ।
दों चि अक्षरांचें काम । उच्चारावें राम राम ॥ ’
‘ सोपें हें साधन लाभ येतो घरा । वाचेसीं उच्चारा राम हरि ॥ ’
‘ सुखाचें फुकाचें सकळांचें सार । तरावया पार भव-सिंधु ॥ ’
‘ स्वल्प वाटे चला जाऊं । वाचें गाऊं विठ्ठल ॥ ’
‘ विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एकसरें भव-सिंधु ॥ ’
‘ बहु चांगलें नाम या राघवाचें । अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ॥ ’

**—समर्थ**

**( २ ) नामस्मरण हें एकच खरें साधन आहे. म्हणजे बाकीचीं साधनें ह्याच्या मदतीशिवाय लंगडीं आहेत.**

‘ नामापरतें साधान नाहीं । जें तूं करिसी आणिक कांहीं ॥ ’
‘ तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामेंविण ॥ ’
‘ नामा म्हणे तया आणिक साधन । ऐसें हें वचन बोलों नये ॥ ’

**( ३ ) नाम-स्मरण हें स्वतंत्र साधन आहे. म्हणजे त्याला इतर साधनांच्या मदतीची अपेक्षा नाहीं.**

‘ न लगे सांडणें मांडणें । आगम-निगमांचें देखणें ॥
अवघें तुका म्हणे । विठ्ठल-नामें आटलें ॥ ’

‘ न लगे लौकिक सांडावा व्यवहार । ध्यावें वनांतर भस्म—दंड ॥ ’
‘ भस्म—दंड न लगे काठी । तीर्थी आटी भ्रमण ॥ ’
‘ तपाचे सायास । न लगे घेणें वन-वास । ’
‘ उपास पारणें न लगे वन-सेवन । न लगे धूम्रपान पंचाग्नि तापणें ॥ ’

**(४) नामस्मरण हें अत्यंत परिणामकारक साधन आहे. ह्यानें अनंत जन्मींचें पाप नाहींसें होऊन नारायण घरीं चालून येतो.**

‘ मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ॥ ’
‘ चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल वेळोवेळां ॥
तुज पाप चि नाहीं ऐसें । नाम घेतां जवळीं वसे ॥ ’
‘ उघडा मंत्र जाणा रामकृष्ण म्हणा । तुटती यातना गर्भवास । ’

‘ तुटे भव-रोग । संचित क्रियमाण भोग ।
ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ।। ’

(५) हें साधन कसें अंमलांत आणावें ह्याविषयीं तीन मुद्दे आहेत.

(अ) चित्ताची एकाग्रता.

‘ बैसोनि निवांत शुद्ध करीं चित्त ।
तया सुखा अंत–पार नाहीं ।।
येऊनि अंतरीं राहील गोपाळ ।
सायासाचें फळ बैसलिया ।।
राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि ।
मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ।। ’
‘ नये वाटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ।। ’

‘ न लगे देश काळ । मंत्र विधानें सकळ ।
मन चि निश्चळ । करुनी करुणा भाकावी ।। ’

(आ) प्रेमाचा जिव्हाळा.

प्रेम तेथें वास करी । मुखीं उच्चारितां हरि ।।
प्रेमें यावें तया गांवा । चोजवीत या वैष्णवां ।।

(इ) सातत्य.

‘ सर्व काळ वाचे उच्चारितां हरि । तया सुखा सरी पार नाहीं ।। ’
‘ आठहि प्रहार बारा मास निरंतर ।।
‘ आपुलाले तुम्ही करा रे स्व–हित । वाचे स्मरा नित्य राम राम ।। ’
‘ पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवस–राती ।। ’
‘ अनन्य–चेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।
तस्याहं सुलभः पार्थ नित्य-युक्तस्य योगिनः ।। ’ ——गीता

# नामदेवांची अमृतवाणी (हिंदी)

अनुवादक : **गणेश विष्णु कानिटकर,** एम्. ए.

## राम बोले राम बोले

प्रत्येक शरीरांत बोलण्याची क्रिया ईश्वरच करतो. हे बंधो! ईश्वराशिवाय दुसरा कोण बोलतो? हत्ती आणि मुंगी ही एकाच मातीची. नानाप्रकारचे घट (शरीरें) ही त्याच मातीची. कीटक, फुलपांखरें आणि सृष्टींतील चराचर वस्तु या ठिकाणी ईश्वर समान भरून राहिला आहे. चित्त जर एक ठिकाणीं म्हणजे ईश्वराच्या ठिकाणीं एकाग्र राहिलें तर सर्व आशा, इच्छा सुटतात. शरणागत नामदेव निष्काम झाला आहे. देवा! तुम्ही माझे स्वामी व मी तुमचा दास आहे.

## रांम सो नामा नाम सो रांमा

तो राम (भगवंत) म्हणजे नाम आणि नाम म्हणजे राम, त्या भगवंताचे आनंदमय स्वरूप. (रामसमान रामनामच). तूं माझा स्वामी व मी तुझा सेवक आहे. परमेश्वर हे एक सरोवर आहे. त्या सरोवरांतील तरंग म्हणजे भक्तजन म्हणता येतील. (तलावाच्या पाण्यांतील लाट ही ज्याप्रमाणें त्या तलावांत उत्पन्न होऊन तिथेंच लुप्त होऊन जाते, तद्वत् जीवात्मा, जो परमेश्वराचा अंश आहे तो, क्षणकाल संसारांत येतो आणि शेवटी परमेश्वरांत विलीन होऊन जातो. तसेच) परमेश्वराचा भक्त हा परमेश्वराला सोडून कोठें जाणार? परमेश्वर हा मोठा वृक्ष आहे; आणि भक्तजन त्याच्या छायेखालील पक्षी आहेत. सेवक हरिभक्ति करतां करतां स्वतःसच गमावून बसतो. नामदेव म्हणतात, मी भगवंताचे नामस्मरण करून भगवंताला प्राप्त करून घेतले आहे. म्हणूनच भगवंत माझ्यांत रमला व मी भगवंतांत सामावून गेलो, भगवंताशीं अनन्य झालो.

## जन नांमदेव पायो नांव हरी

दास नामदेवांना हरिनाम प्राप्त झाले आहे. अरे वेड्या! आतां मृत्यु येऊन काय करणार? आतां परामुक्ति माझीच झाली आहे. ईश्वराच्या ठिकाणीं नानाप्रकारें प्रेम व भक्ति केली. तिच्या फळाशी मला काय करावयाचे आहे? केवळ ब्रह्माच्या ठायीं लय लागला आहे. बिचारी मुक्ति कोठे आहे पत्ता नाहीं. हरिनामानें सनकादिक

तरून गेले. त्या हरीला अंत नाहीं. नामदेव म्हणतात, हरिभक्तांनो! ऐका. हचे माझे विचार—सर्वस्व.

### रांमनाम जपिबौ श्रवननि सुनिबौ

अरे! रामनामाचा वारंवार जप कर. ते कानांनीं ऐक; मोहरूपी जलप्रवाहांत वाहावत जाऊं नकोस. जे अनिर्वचनीय ते बाबा सांगतां येत नाहीं. कागदावर लिहून दाखवितां येत नाहीं. सकल भुवनांचा स्वामी सहज लाभला आहे. तोच माझी माता, तोच पिता, तोच सर्वांचा चैतन्यदाता! नामया शिंपी म्हणतो कीं, गीता हें गर्जून सांगत आहे.

### धृग ते बकता धृग ते सुरता

प्राणाच्या अधिष्ठात्याचे नांव न घेणाऱ्या वक्त्याचा आणि श्रोत्याचा धिःक्कार असो! रामनामाचे वर्म जाणले नाहीं तर सर्व संगीत, वेद, पुराणें ही व्यर्थ बडबड होय. पंडित आहे तो वेदाची वाखाणणी करतो, पण अज्ञ नामदेव फक्त रामनाम जाणतो.

### हरि बिन कौन सहाइ करैगो

हरिवाचून तुला कोण सहाय्य करील? जर अशी संधी गमावशील तर माकडाच्या जन्माला येशील आणि कर्मांची दोरी हातीं असलेला गारुडी तुला मात्र वारंवार घरोघर नाचत फिरवील. त्यानें काठी घेऊन तुला धाक दाखविला कीं तूं प्रत्येकाच्या पाया पडशील. डोक्यावर ओझे वाहाणाऱ्या हमालाप्रमाणें मजुरीच्या लालचीनें मरशील आणि ज्याप्रमाणें कुंभार आपले चक्र फिरवितो त्याप्रमाणें तूं कित्येक वेळां फिरशील. मोक्षदात्या भगवंताचे भजन करीत रामनाम घेतलेस तर कांहीं बिघडणार नाहीं. भगवन्नामाचा प्रताप आपल्या हृदयांत साठव म्हणजे भगवंत शरणागताचे रक्षण करील असें नामदेव म्हणतात.

# श्रीसाईबाबा पुण्यतिथि (शके १८८९)

आश्विन शुद्ध नवमी बुधवार दिनांक ११–१०–६७ पासून दिनांक १३–१०–६७ शुक्रवारपर्यन्त तीन दिवस श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचे समाधी मंदिरांत ४९ वा पुण्यतिथी उत्सव साजरा झाला.

या उत्सवाकरितां नेहमी प्रेमानें मुंबई, पुणें, मध्यप्रान्त, विदर्भ, मराठवाडा, आंध्र, म्हैसूर, मद्रास वगैरे ठिकाणाहून पुष्कळसे भक्तलोक आले होते. यंदा जनसंख्या कमी प्रमाणात होती.

उत्सव कार्यक्रम दिनांक ११–१०–६७ बुधवार रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त पहांटे ६ वाजता पोथी व श्रींच्या फोटोची मिरवणूक श्रींचे मंदिरांतून गुरुपादुकामार्गे श्रींचें द्वारकामाईत चांदीच्या भव्य सिंहासनात फोटोची स्थापना होऊन पोथी पारायणास प्रारंभ झाला. त्यानंतर दोनप्रहरी ४॥ वाजतां श्रींचे समाधी मंदिरात श्री. इंगळेबाई (मुंबई) यांचे सुश्राव्य कीर्तन झालें, रात्रौ श्रींच्या पालखीची मिरवणूक गांवातून काढण्यांत आली.

दिनांक १२–१०–६७ रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त पहांटे ६ वाजतां परत पोथी व फोटोची मिरवणूक श्री द्वारकामाईतून गुरुपादुकामार्गें मंदिरांत परत आली. त्यानंतर भक्तांचे सामुदायिक अभिषेक करण्यांत आले. ९ वाजतां गांवांतून भिक्षेची मिरवणूक मे. माननीय डी. डी. पाटणकर कोर्ट रिसिव्हरसाहेब यांचे देखरेखेखालीं झाली. श्रींची कापडाची प्रसाद म्हणून विक्री झाली. ११ ते १२॥ पर्यंत श्रींचे समाधि मंदिरांत संस्थानचे गवई विठ्ठलराव मराठे यांचे साई पुण्यतिथी या आख्यानावर कीर्तन झालें. दुपारीं नेहमींप्रमाणें माध्यान्ह आरती झाली. तीर्थ–प्रसाद देण्यांत आला.

नंतर मे. माननीय कोर्ट रिसीव्हरसाहेब डी. डी. पाटणकर यांच्या हस्ते आराधना विधी करण्यांत आला.

सायंकाळीं ५ वाजतां सिमोल्लंघन मिरवणूक श्रींचें समाधि मंदिरांतून निघून गांवाबाहेर खंडोबाच्या मंदिरानजीक मे. माननीय कोर्ट रिसिव्हर डी. डी. पाटणकर यांच्या हस्ते शमीपुजन व ध्वजपुजन होऊन परत ही मिरवणूक श्रींचे समाधी मंदिरात आली. रात्रौ ९ ते ११॥ पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गांवांतून सुर, सनई, चौघडा, बॅन्डवादन, गारूड–भारूड, भजनीदिंडी यासह गांवांतुन मिरवणूक निघाली,


रात्रौ ११॥ ते पहाटे ६ वाजेपर्यंत कलाकाराच्या हजेऱ्या व रात्रभर मंदीर भक्ताच्या दर्शनार्थ खुले ठेवण्यांत आले होते.

दिनांक १३–१०–६७ शुक्रवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक पूजा, अभिषेक व गोपालकाला कीर्तन दहीहंडी होऊन उत्सव समाप्त झाला.

या उत्सवाकरितां प्रत्येक खातेप्रमुखांची सभा उत्सवाचे अगोदर मे. माननीय कोर्ट रिसिव्हरसाहेब यांच्या देखरेखीखाली भरून त्यात ठरल्याप्रमाणें सर्व कार्यक्रम उत्तमरितीनें पार पडले.

उत्सवात तीन दिवस संस्थानचे नोकर, सेवेकरी व सन्माननीय पाहुणे यांना अल्पोपहार ( चहापान ) देण्यांत आला. श्रमपरिहारार्थ संस्थानच्या नोकरांना एक दिवस मिष्टान्नाचे भोजन देण्यांत आले.

उत्सवामध्यें प्रसिद्ध कलाकारांना मुद्दाम आमंत्रण देण्यांत आले होते. श्रीमती शकुंतला पळसोकर अकोला यांचे सुश्राव्य गायन झाले. सौ. शोभा विश्वनाथ गुर्टु, मुंबई यांचा गायनाचा कार्यक्रम फारच बहारीचा झाला. येणेंप्रमाणें उत्सव उत्तम रीतीनें पार पडला.



# सुखाचा शोध

लेखक : ज. शा. देशपांडे

**सुख हें आपल्या मनावर, मनाच्या सामर्थ्यावर अवलंबून असतें हें समजलें पाहिजे व तें समजणें फार कठीण आहे. त्यासाठीं मार्गदर्शनाची जरूरी असते. तें जसें सद्‌गुरु करूं शकतात, त्याचप्रमाणें तें मार्गदर्शन करण्याचें सामर्थ्य श्रेष्ठ साहित्यांत असतें. महाराष्ट्राच्या सुदैवानें असें वाङ्मय महाराष्ट्रांत पूर्वीच्या काळांत बिपूल निर्माण झालें आहे. 'जगीं सर्व सुखी असा कोण आहे। विचारें मना तूंचि शोधूनि पाहें ॥ ह्या अमर ओळींत समर्थांनीं काय सांगितलें आहे, याचा आपण विचार केला पाहिजे.**

अनादिकालापासून मानवजात सुखाच्या शोधांत आहे, पण सुख अशी चमत्कारिक चीज आहे कीं त्याच्या मागें जितकें लागावें तितके तें दूर पळतें, आणि सुखाऐवजीं दुःख पदरांत पडतें. सुख म्हणजे काय असा प्रश्न उपस्थित केल्यास त्याचें उत्तर मात्र देतां येणें कठीण, कारण सुखाच्या कल्पना निश्चित नसतात. स्वतःचें घर नसलेल्या माणसाला वाटतें कीं आपलें एक घर असलें कीं आपण पुष्कळ सुखी होऊं. दैवयोगानें घर मिळालें तर त्याला दोनचार घरें नाहींत म्हणून दुःख होण्यास प्रारंभ होईल. त्याची मनोवृत्ति अशी विचित्र असतें कीं असलें अनिश्चित तऱ्हेचें सुख नष्ट होण्यास कुठलेंहि कारण पुरतें. दुसऱ्यावर अन्याय झाला तर त्याचें त्याला फारसें कांहीं वाटत नाहीं. स्वतःवर अन्याय झाला तर त्याला एकदम दुःख होतें. कांहीं वेळां दुसऱ्याला सुख मिळतें हेंहि दुःखाचें कारण होऊं शकतें. सर्वजण सतत कसल्यातरी सुखाच्या मागें धांवत असतात, परंतु आपली धांवाधांव कशासाठीं आहे व आपल्याला नक्की काय हवें, याचा शांत चित्तानें विचार करण्यास कोणी तयार नसतो. तथापि खरें सुख कशांत असेल असा विचार क्षणभर तरी प्रत्येकाच्या मनांत डोकावून जातो. अर्थात् तो क्षणभरच. 'सुख पाहतां जवापाडें ।। दुःख पर्वता एवढें ' असें तुकाराम महाराज म्हणतात या उक्तींतला अनुभव सर्वांना येतो. सुखाबरोबर दुःख कां ? याचा विचार करूं लागलों

तर त्याचें उत्तर सृष्टीरचनेंतच सांपडलों. जगाच्या निर्मितींत मोठ्या विलक्षण तऱ्हेनें द्वंदे गुंफिली असून प्रत्येक गोष्ट दोन रूपांनीं वावरत असते. प्रकाशाबरोबर काळोख, चांगल्याबरोबर वाईट. सुखाबरोबर दुःख तयारच. ज्या गोष्टीपासून दुःख होते. आणि दुःख नको असेल तर सुखासाठीं धडपड सोडून द्यावयास पाहिजे हें उघड आहे.

## समाजाची उत्क्रांती व धनसंचय

समाजाची कालानुसार उत्क्रांती चालू आहे. प्राचीन काळीं जेव्हां मनुष्य टोळ्या करून राहात असे तेव्हां त्याला व्यक्तिगत हक्क थोडे होते व बहुतेक गोष्टींवर टोळीची सामुदायिक मालकी असे. हळुहळू व्यक्तीगत हक्काची कल्पना रूढ झाली व त्यांची व्याप्ती वाढूं लागली. प्रत्येकजण प्रथम स्वतःसाठीं व पुढें पोराबाळांच्यासाठीं संग्रह करूं लागला. संग्रहांचे रक्षण करण्यासाठीं रखवालदार निर्माण झाले व त्यांना गणवेश दिला गेला. त्यांना आपण पोलीस म्हणतो. मालकी हक्कांचें रक्षण करण्यासाठीं कायदे उत्पन्न झाले. या हक्कामुळें भांडणें होऊं लागली व त्यांचा निकाल लावण्यासाठीं समाजातल्या कांहीं लोकांच्या अंगावर झूल चढवून त्यांना निवाडे देण्यास बसवले. त्यांना आपण न्यायाधीश म्हणतो. हे सर्व प्रकार समाजाच्या विकासाला आवश्यक होते. पण बदलत्या परिस्थितीप्रमाणें समाजरचनेंत जरूर ते फेरफार योग्यवेळीं कधीं झाले नाहींत त्यामुळें मालकी हक्कापासून लोभ व स्वार्थ वाढीस लागला. स्वार्थसाधू लोकांना सत्ता काबीज करणें सुलभ होऊं लागलें. व्यक्तिगत हक्क आणि समाजाचे हक्क यांचा समन्वय कुठें व कसा घालावयाचा हा प्रश्न उभा राहिला. या प्रश्नाचें उत्तर तात्त्विकदृष्ट्या काढणें शक्य असलें तरी व्यवहारांत हा प्रश्न सुटलेला नाहीं.

गेल्या कांहीं शतकापासून शास्त्रांची प्रगती होऊं लागली. तिच्यामुळें संग्रहाची व चैनीची मर्यादा वाढली. अखिल मानवजातीवरच नाहीं तर प्राणिमात्रावर प्रेम असावें ही उदात्त कल्पना बाजूला राहून मालकीच्या निर्जीव वस्तूवरच लोक प्रेम करूं लागले. आतांच्या काळांत मोटार, रेफ्रिजरेटर यासारख्या निर्जीव वस्तूंच्याकडे कौतुकानें बघत बसणारे आणि त्यांना हळुवारपणानें पुसणारे पुष्कळ लोक आढळतात. इस्त्रीची गंमत पहा. इस्त्रीच्या कपड्यांनी त्या माणसाच्या गुणांत किंवा त्यांच्या सुखांत भर पडते असं थोडेंच आहे ? पण कडक इस्त्रीचे शुभ्र कपडे घालून मिरवणें ही एक सामाजिक आवश्यकता समजली जाते. मग परटाकडून रोग आले तरी चालतील. रोज जामानिमा करण्यांत वेळ घालवून नटणारी मुरडणारी मंडळी व अंगावर कपडे चढवलेली बुजगावणी यांच्यात खरोखरी फरक तो कसला ? अंतराळांतून एखाद्या अपार्थिव भूतानें या मानवी कृती पाहिल्या तर त्याची मोठी करमणूक होईल.

## साध्य साधन होऊन बसलें

जेव्हां पैसा नव्हता तेव्हां संपत्तीसंचय करणें कठीण होतें. हजारों गाई–म्हशी कशा बाळगणार ! उत्क्रांतीनुसार पैसा या गोष्टीनें प्रवेश केल्यावर धनसंग्रह करणें सोपें होऊन स्वार्थ बळावला. मूलतः जें साधन होतें तें साध्य होऊन बसलें. बँका निघाल्यावर आणखी घोटाळा झाला. धनसंचय करणें फारच सोपें झालें. आतां वाटेल त्या मार्गांनीं पैसा मिळवून तो सांठविणें हें अनेकांचें आयुष्याचें एकमेव ध्येय ठरलें आहे व त्यांना बँकेचे आंकडे पाहूनच सुख मिळतें. जितका मोठा माणूस तेवढी त्याची पैशाची हांव मोठी. पैशानें सत्ता काबीज करणें सुलभ असतें. अशा या पैशासाठीं मनुष्य अहोरात्र नाना तऱ्हेच्या धडपडी करीत असतो आणि लाचारी व मानहानी पत्करतो. या लाचारीला गोंडस नांव दिल्यानें तिचें खरें स्वरूप पालटत नाहीं. विक्रीत कौशल्य म्हणजे काय तर जोडे, बूट इत्यादि वस्तु विकत घ्याव्या म्हणून लाचारी ! मोठमोठे विद्वानसुद्धां पैशाच्या आशेनें सत्ताधीशांच्यापुढें लाचारी करतात व त्यांचे भाट बनतात, तिथें अन्यजनांची काय कथा ?

संपत्तीचा संचय करणे सोपें झाल्यानें पैशाकडे पैसा ओढला जातो. त्यामुळें श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होत जातात. पण दुःखी दोघेही. गरीब गरीबीमुळें दुःखी व श्रीमंत संपत्तीच्या दुःखांनीं ग्रस्त. श्रीमंतांची दुःखें कमी होण्याऐवजीं वाढलेली असतात. त्यांच्या घरी हेवेदावे भरपूर असतात व शंकराचार्यांनी सांगितल्याप्रमाणें 'पुत्रादपि धनभाजां भीतिः' अशी अवस्था असते. जरुरीपेक्षां संचय झाला कीं सैतानानें प्रवेश केलाच समजावें. लक्ष्मी तर फार चंचल. श्रीमंतावर तिची अवकृपा होऊन तो रंक झाला तर त्याचें दुःख बघवणार नाहीं. खराखुरा समाजवाद आला तर त्या समाजातल्या सर्व वर्गांची दुःखें कमी होतील यांत शंका नाहीं. मात्र तो खराखुरा समाजवाद असला पाहिजे. नाहींतर तकलुपी समाजवादाच्या उपायांनी सामान्य लोकांचे हाल कमी होण्याऐवजीं जास्त होतील.

## औद्योगीकरणाच्या युगांतलीं दुःखें

हल्लीं आपण शास्त्रीय युगांत वावरत असून सगळीकडे झपाट्यानें औद्योगीकरण होत आहे. त्याचे सामान्य जीवनावर होणारे आघात फार तीव्र आहेत. औद्योगीकरण स्वतः घातक आहे असें नाहीं. पण त्याचे संभाव्य दुष्परिणाम वेळीच जाणून ते टाळणारे नेते दुर्दैवानें समाजांत अस्तित्वांत नाहींत. त्यामुळें मोठा कारखाना उभारला कीं त्याला लागूनच झोपडपट्टी तयार होते. पाठोपाठ पाण्याची टंचाई, घराची टंचाई, गुन्हेगारीची वाढ, प्रवासाची पंचाईत. असल्या औद्योगीकरणामुळें सामान्य माणसांना नको हें जगणें असें झालेलें दिसतें. महागाईच्या

भस्मासुरामुळें रहाणीचें मान घसरगुंडीला लागलें आहे. चंद्रगुप्त मौर्य, अल्लाउद्दिन खिलजी यांच्या काळांत कडक भावनियंत्रण होते. आतांच्या सुधारलेल्या युगांत भावनियंत्रण रुपशेल बेपत्ता असून गूळ तीन रुपयाला राजरोस विकला येतो. सत्तर वर्षांपूर्वी ज्या जागेची प्राप्ती वीस रुपये होती ती आतां शंभर आहे, पण दुधाचा भाव पंचवीसपट होऊन सामान्य कुटुंबाला दूध ही चैनीची वस्तु झाली. अन्न, वस्त्र, निवारा या तीन मूलभूत गोष्टींना पारखे होणाऱ्यांची संख्या वाढत आहे. स्वतःच्या जमिनीच्या तुकड्यावर सुखासमाधानानें राहाणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी खुषीनें अथवा सक्तीनें कारखान्यांना दिल्यानें ते मजूर बनून त्यांचें जीवन उध्वस्त होत आहे. यंत्राचे दास होऊं नका, खेडी अगोदर सुधारा, लहान लहान उद्योगधंदे उभारा असें माहात्माजींसारख्या द्रष्ट्यांनी पुष्कळ सांगितलें, परंतु त्यांच्या सांगण्याचा बिलकुल उपयोग झाला नाहीं. मोठमोठ्या योजनांपासून उत्पन्न होणारी वशिलेबाजी, लांचलुचपत, पैसे खाणें इत्यादि अरिष्टांचें लोण देशाच्या कोपऱ्यापर्यंत पोंचून समाजाचा डोलारा अत्यंत पोकळ झाला आहे. संतांचें आगर असलेल्या महाराष्ट्रांत पैशासाठीं वाटेल ते करण्याची प्रवृत्ती नव्हती, ती औद्योगिकरणानें येऊं पाहात आहे. औद्योगिकीकरणाचे महाराष्ट्राच्या संस्कृतीवर फार विकृत परिणाम होत आहेत या गोष्टींचा विचार अजून तरी पुढाऱ्यांनी करावा.

## व्यायाम नसल्यानें रोगांना आमंत्रण

पूर्वी सर्वजण घरीं दळण करीत व विहिरीचें पाणी काढीत. अलिकडे पिठाच्या गिरण्या आल्या व नळ पुष्कळ ठिकाणी आले आहेत. लोकांचा वेळ वाचला खरा पण त्या वेळेचा कोणी नीट उपयोग करतो असें लहान गांवांत तरी दिसत नाहीं. उलट आपोआप होणारे व्यायाम जाऊन त्यांची जागा घेणारे व्यायाम नसल्यानें रोगांना आमंत्रण मिळालें. गिरणीवाला मात्र पीठ राजरोस चोरून श्रीमंत होतो. या सुधारणांनीं मग काय मिळवले तर गरजा वाढल्या इतकेंच. एका पर्वतावर राहणाऱ्या वन्य जमातींत साधारण टोपीसारख्या भांड्यांत भाकरी करीत. मग त्यांत भाजी करून त्यांतच जेवण होई. नंतर तेच भांडे धुवून पाण्यासाठीं वापरलें जाई आणि बाहेर पडतांना त्याचीच टोपी होई. एका भांड्यांत संसार. त्यांना खोटें बोलणें ठाऊक नसते. प्रत्येकाची एक झोपडी व भोंवतीं हवी तेवढी जमीन असे. पशुपक्षांना देखील स्वतःचें बीळ असते, पण आपल्या तथाकथित संस्कृतींत असंख्य लोक घरदाराखेरीज जीवन कंठितात. ही संस्कृती केवढी उच्च मानावयाची ?

## प्रचलित भेसळीची संस्कृति

या प्रचलित संस्कृतींत काळाबाजार, लाचलुचपत, वशिलेबाजी, भेसळ इत्यादि अनिष्ट प्रकार इतक्या थराला पोचलेत कीं, ते दैनंदिन जीवनाचें अंग असल्याचें प्रत्येक-जण गृहीत धरतो. नामांकित पेढ्या मुलामा चढवलेले दागिने खरे म्हणून विकतात. तूप म्हणून जें कांहीं मिळतें त्याचा तुपाशीं कांडीचा संबंध नसतो. औषधांत भेसळ, खाण्याच्या वस्तूंत भेसळ. हे सर्व भर चवाट्यावर चालू शकते. प्रत्येकजण असल्या जीवनचक्रामध्यें इतका दंग असतो कीं, भोंवती काय चाललें आहे याचा विचार करण्यास कोणाला फुरसत नसते. कायदे कागदावर राहातात आणि ते अमलांत आले तर माणुसकीचा लोप होईल अशा तऱ्हेनें अमलांत येतात. ज्ञान जितक्या प्रमाणांत वाढत आहे तितक्या प्रमाणांत ते जनतेपर्यंत पोंचत नसल्यानें एकंदरींत अज्ञान वाढत आहे. वृत्तपत्रें वाढली, त्यांचा खप वाढला, पण हजारो लोक विचार न करतां वर्तमानपत्रातला छापील शब्द वेदवाक्य मानतात. अशातऱ्हेनें विचारशक्तीचें खोबरे झालें म्हणजे ऑर्वेल या प्रसिद्ध लेखकानें वर्णन केलेले १९८४ साल सहज उगवूं शकेल.

## साहित्याची अनुकंपनीय स्थिति

बहुसंख्य विद्यार्थी यंत्रशास्त्रज्ञ होऊं पाहातात. कां तर यंत्रशास्त्रज्ञांना खूप पैसा मिळतो म्हणून. भाषा, इतिहास इत्यादि विषयांना किंमत नाहीं. साहित्याची स्थिती दिवसेंदिवस अनुकंपनीय होत चालली आहे. मागच्या पिढीसारखे निष्कांचन राहून वाङ्मयसेवा करणारे लोक आतां दिसणें कठीण. ज्याला कसले भांडवल लागत नाहीं असे परीक्षणकार हवे तेवढे. साहित्य संस्थांपैकीं अनेकांचा नाटकाखेरीज साहित्याच्या कुठल्याहि अंगाशीं संबंध नसतो. नाटकें धूमधडाक्यानें होतात, पण त्यांच्यांत शाकुंतलसारखी महान् नाटकें दिसत नाहींत; कारण तीं पेलत नाहींत. मग जगासमोर उभें राहू शकेल असें कुठलें वाङ्मय निर्माण होणार? शास्त्र घड असावे तर तेही नाहीं. दुसऱ्या देशांत चंद्रावर जाण्याची तयारी आहे तर आपल्याकडे हजार वर्षांपूर्वी आपले पूर्वज जेवढ्या मजबूत व हलक्या विटा करीत होते तेवढ्या चांगल्या विटा-दखील करतां येत नाहींत, अथवा मातीची घरणें बांधता येत नाहींत. बांधली तर काय होतें तें प्रसिद्ध आहे. प्रयोगशाळातून वरची जागा कशी गांठावयाची याबद्दल हेवेदावे तेवढे चालू असतात व संशोधन थंड असतें. बहुतेक कारखान्यांत शास्त्रज्ञांचा उपयोग करून चांगल्या दर्जाचें काम कसें होईल हें पाहाण्याऐवजीं कमींत कमी मेहनत घेऊन जास्तीत जास्त पैसा कसा मिळेल इकडेच कामगारापासून चालकापर्यंत सर्वांचें लक्ष असतें.


ही यांत्रिक संस्कृती निसर्गापासून दूर चालली आहे. शहरातल्या बहुसंख्य

मुलांना आंगण, बाग इत्यादि शब्द अपरिचित असतात. फुलें, झाडें यांची जवळ जवळ कांहीं माहिती नसते. फुलांच्या सुगंधापासून काय आनंद होतो तो त्यांना कसा कळणार? या संस्कृतींत कला नाहीं, फारसा वाव नाहीं. अजिंठा वेरूळसारखी मनोवेधक कलाकृती आतां होणार नाहीं. त्या कृती निर्माण करणारांना पगाराचें स्केल नव्हते, पण त्यांना श्रद्धा आणि भक्तीचें बळ होतें. प्रशांत मुद्रा धारण केलेली बुद्धाची आकृती पूर्ण केल्यावर त्या कारागिराला केवढा आनंद झाला असेल? आतां असे कारागिर होणार नाहींत. काळज्या, चिंता यांनीं पछाडलेली 'साहित्य संगीत कलाविहीन' माणसें ही संस्कृती भरपूर निर्माण करील.

## सुख कोठें मिळेल?

ज्या देशांत सुबत्ता आहे, चांगला राज्यकारभार आहे, प्रामाणिकपणा आहे अशा देशांतसुद्धां लोकांना आपण सुखी आहोंत असें वाटत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांच्याकडे जुने रोग जाऊन आधुनिक मानसिक विकृतींचे रोग बळावत आहेत. याचा अर्थ उघड आहे कीं, नुसत्या शरीराच्या गरजा पुरवून माणूस सुखी होत नाहीं. त्याच्या मानसिक उन्नतीची जरूर असते. त्याच्या खऱ्या-खुऱ्या शारीरिक गरजा फार थोड्या असतात व त्या जेवढ्या कमी तेवढा तो अधिक सुखी व स्वतंत्र असतो. हें जाणून आपल्या प्राचीन ऋषींनीं अपरिग्रहाचे महत्त्व सांगितलें. ज्या समाजांत अपरिग्रहाची तयारी असते त्या समाजांत काळाबाजार होणें कठीण. समजा, साखर महाग झाली तर कोणी साखर विकत घेणार नाहीं. प्राचीन काळीं हिमालयांत कांहीं साधुपुरुषांनीं एक विद्यापीठ चालवले होतें असें म्हणतात. तें झाडाखालीं भरत असल्यामुळें त्याला सरकारी अधिकाऱ्यापुढें लाचार बनून अनुदानासाठीं तोंड वेंगाडण्याची जरूर नव्हती. एकदां शत्रू आल्यावर विद्यापीठ पसार झालें व नंतर परत आलें. अशा स्वतंत्र लोकांचा पराभव कोण करणार? समाजाची खरी श्रेष्ठता मानसिक विकासांत असते, आधिभौतिक गोष्टींच्या विकासांत नाहीं, ही गोष्ट आतां पाश्चिमात्यांना कळूं लागली आहे. आपण मात्र त्यांच्याकडील जुन्या विचारांचें अंधानुकरण करीत आहोंत. तसें पाहिलें तर सर्व शास्त्रें, वाङ्मय, तत्त्वज्ञान इत्यादिकांचें उद्दिष्ट एकच आहे. आपण कोण, कोठून आलों, कुठें जाणार असे मूलभूत प्रश्न अनंत काल मनुष्यजातीला भेडसावीत आहेत. त्यांची उत्तरें शोधून त्याला परतत्वापर्यंत नेणें हें तें उद्दिष्ट होय. पण आधिभौतिक शास्त्रांची गति एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच जाते व त्याच्यापुढें मनाच्या पलिकडल्या अज्ञात प्रांतांत शिरावें लागतें. प्रज्ञा विकास पावून ज्यांनी मनाच्या सर्व शृंखला तोडल्या होत्या अशा प्राचीन ऋषिवर्यांना या प्रश्नांची उत्तरें खात्रीनें समजली असणार. प्रज्ञा स्वतंत्र झाल्यावर प्रश्न कुठले उरणार? प्रत्येक माणसानें

आपण स्वतंत्र झालो असें समजून वागावें म्हणजे भारत स्वतंत्र होईल असें महात्माजी म्हणत त्याचें इंगित हेंच होतें. 'सुरूचें झाड सर्व ऋतूंत टवटवीत असतें. त्याला आझाद म्हणतात. तसें आझाद व्हा' असें शेख सादी म्हणत असे. उलट-सुलट कल्पना, रूढी इत्यादिनी माणसाला शृंखलाबद्ध करून दुःखी केलें आहे. त्यांच्यापासून मुक्त होऊन शांतपणें विचार करतां आला तर सुख हे केवळ मनांत असतें हें कळून सुखासाठीं धांवाधांव करण्याची जरूर उरणार नाहीं, ही गोष्ट अतिशय कठीण आहे व त्यासाठीं मार्गदर्शनाची जरूर असते. तें करण्याचें सामर्थ्य असलेली एक गोष्ट म्हणजे श्रेष्ठ साहित्य. अशा साहित्याला ज्ञानेश्वरांनी सांगितल्या-प्रमाणें परतत्त्वाचा संपर्क झालेला असतो. महाराष्ट्राच्या सुदैवानें असें वाङ्मय महाराष्ट्रांत पुष्कळ निर्माण झालें व 'जगीं सर्व सुखी असा कोण आहे। विचारें मना तूंचि शोधोनि पाहे ॥' अशा ज्या अमर ओळींत सुख कोठें आहे याचें उत्तर श्री समर्थांनी देऊन ठेवलें आहे, त्या ओळी या वाङ्मयापैकींच आहेत.



# हेलन

( जगांतील सर्वांत सुंदर स्त्री )

लेखक : द. शं. टिपणीस

**इ.** स. पूर्वी ९०० वर्षे अंधकवि होमर यानें ऑडेसि व इलिअड ही दोन महाकाव्यें रचली. युरोपियन भाषेंतील काव्याचा जनक म्हणून होमरला मान मिळतो. आपल्याकडील रामायण व महाभारत या काव्याना साहित्य, राजकारण, व्यवहार, नीति वगैरेच्या दृष्टीनें जें महत्व आपण देतो तसेच महत्व ऑडेसि व इलिअड या महाकाव्याना तिकडे दिले जाते. मानवी व्यवहारांतून दिसून येणारी त्याची बुद्धि व मन, निरनिराळे मानवी स्वभाव यांचें सुंदर व सुक्ष्म दर्शन या महाकाव्यांतून होते. जाति-धर्म-वंश यामुळें निरनिराळ्या देशीच्या मानवांत कांहीं भेदाभेद आढळत असले तरी एकंदरीत मानवी स्वभाव व भावना या येथून तेथून सारख्याच असतात. हिंदु स्त्रीच्या ठिकाणीं वात्सल्याची जशी व जेवढी भावना असते तशीच व तेवढीच ती मुसलमान वा खिस्त स्त्रीच्या ठिकाणीं असते. निरनिराळ्या मानवी वंशाच्या वाङ्मयाचा अभ्यास केल्यानें सर्व मानवांत कोणते मनोधर्म व भावना समान आहेत याचें ज्ञान होऊं शकेल, व तेणेंकरून त्या समान पायावर मानव जातीचे एकिकरण होण्यास तसेंच मानवां मानवांत सहकार्य, सख्य, समानता व बंधुभाव निर्माण होण्यास बरीच मदत होईल. इलिअड या महाकाव्याची ओझरती ओळख करून देण्यासाठीं त्या काव्यांतील एक गोष्ट संक्षिप्त रूपानें पुढें दिली आहे. तीमध्यें माणूस कशामुळें बलवान होतो व त्याला मोहांत पाडण्यास सर्वांत सामर्थ्यवान् कोण व त्यामुळें त्याचाच नव्हे तर त्याच्याबरोबर त्याच्या सर्व बांधवांचाहि कसा नाश होतो याचे सुंदर दर्शन घडविलें आहे.

फार प्राचीन काळीं ट्राय हें एक वैभवशाली शहर एशिया मायनरमध्यें होतें. शहराचा व्यापार दांडगा होता. दूरदूरच्या देशाशीं व्यापार चाले. शेती समृद्ध होती, पिकपाणी, दुधदुभतें भरपूर होते. तेथील लोकांना ट्रॉजन म्हणत. ट्रॉजन हें शक्तिमान शूर व पराक्रमी होते. अशा वैभवसंपन्न राज्याचा प्रियाम हा राजा होता. त्याच्या वडील मुलाचें नांव पॅरिस व हेक्टर धाकटा. राजा व प्रजा मोठ्या आनंदानें व सुखानें

जीवन चालवीत होती. प्रियाम म्हातारा झाल्यामुळें धाकटा मुलगा हेक्टर राज्यकारभार बघी.

पॅरिसच्या जन्माआधीं राणी हेक्यूबा हिला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत आपण एका जळत्या मशालीला जन्म दिला असें तिनें पाहिलें. हें अशुभ स्वप्न तिनें राजाला सांगितलें. राजानें ज्योतिषांना बोलावून त्यांना स्वप्नाचा अर्थ विचारला. बोटें मोडून ज्योतिषांनीं हिशोब केला व राजाला सांगितलें कीं, राणीला मुलगा होईल, पण तो ट्रॉय शहराच्याच नव्हे तर ट्रायनवंशाच्या नाशास कारणीभूत होईल. हे टाळण्यासाठीं जन्मल्याबरोबर मुलाचा नाश करण्यांत यावा असा सल्ला त्यांनीं राजाला दिला. राणीला मुलगा झाला. तोच हा पॅरिस. जन्मल्याबरोबर राजानें त्याला इडापर्वताच्या जंगलांत टाकून दिलें. हिंस्रपशूंच्या तडाख्यांतून तो वांचणार नाहीं याची राजाला खात्री होती. पण दैव जाणिले कुणी ? एका धनगरानें त्याला पाहिले. त्यानें पॅरिसला घरीं नेले व वाढविले. पॅरिस मोठा झाला. तो अति सुंदर, धैर्यवान, सामर्थ्यशाली होता. धनगर म्हणून तो त्या जंगलांत वाढत होता. मेंढ्यांच्या कळपांत असलेल्या सिंव्हाच्या छाव्याला आपण सिंह आहोंत ही जाणीव केव्हांना केव्हां तरी होणारच. राजतेज काय लपून राहणार ? इतर धनगरांपेक्षां तो निराळा दिसे. आपण खरोखर जन्मानें धनगर आहोंत काय असा त्यालाही संशय येऊं लागला.

याच सुमारास स्वर्गांत एक खळबळजनक प्रकार घडला. एका देवतेचें मानवाशीं लग्नसमारंभानंतर एक मोठा भोजन समारंभ आयोजित करण्यांत आला. मेजवानीस सर्व देव-देवतांना आमंत्रण दिलें होतें. फक्त एका देवतेला आमंत्रण नव्हते. ती वाईट होती. रामायणांतील कुब्जाच म्हणाना. जाईल तिथें ती भांडणें कलागती लावी. मेजवानीच्या आनंदांत नसतें विघ्न नको म्हणून तिला बोलावले नव्हते. देवांची मेजवानी थाट काय विचारावा. चमचमीत पदार्थ. सर्व देवदेवता हजर होत्या. देवांचा राजा झ्यूस, त्याची राणी हेरा, शहाणपणाची देवता अॅथीनी, सौंदर्याची देवता अॅफ्रोडिटी, सूर्य देव, चंद्र देवता आदि झाडून सारे देव हजर होते. आनंदानें भोजन चालू होतें. तेवढ्यांत एकाएकी एक सोन्याचें नारिंग धपकन मेजावर येऊन पडले. त्या नारिंगावर "सर्वांत सुंदर असलेल्या स्त्रीसाठीं" अशी अक्षरें कोरली होती. लगेच तीन देवता तें नारिंग घेण्यासाठीं पुढें आल्या. मी सर्वांत सुंदर. तें माझें असें प्रत्येक म्हणूं लागली व नारिंगासाठीं त्यांच्यांत झोंबाझोंबी चालू झाली. त्या तीन देवता म्हणजे हेरा, अॅथीनी व अॅफ्रोडिटी या होत्या. भांडण सोडविण्यासाठीं देवाधिदेव झ्यूस यानें सुंदर कोण हें ठरवावें व तिला नारिंग द्यावे असें सर्व देवांनीं सुचविलें. त्या तीन देवतांनाही हें मान्य झाले व भांडण तात्पुरते थांबलें.

परंतु देवांनीं काढलेल्या तोडग्यामुळें झूस विचारांत पडला. निकाल देणें एकंदरींत धोक्याचेच वाटलें त्याला. जिला सर्वांत सुंदर म्हणून आपण ठरवूं तिच्या खेरीज दुसऱ्या दोन देवता कोपतील व सूड घेण्याचा प्रयत्न करतील हें तो ओळखून होता. आपल्या निकालामुळें देवामध्यें नसतेच भांडण उत्पन्न होईल. निकाल न द्यावा तर आपण भित्रे असा गैरसमज होईल. या पेंचातून सुटण्यासाठीं विचारांतीं त्यानें एक मार्ग काढला. अगदीं साधा मार्ग. समिती नेमून पाहुण्याच्या हातून साप मारविणें. हा निवाडा करण्याचें काम एकाद्या मानवाकडे सोपवावे. म्हणजे परभारे पावणेतेरा. झालीच भांडणें तर तीं त्यांच्यांत होतील. देवलोक आपला सुरक्षित राहील. आपल्या शब्दाला मान देईल असा मानव कोण ? पॅरिस ! हो. तोच या कामीं योग्य. कारण सर्वांत सुंदर आहे तो. सुंदरानेंच सुंदराची परीक्षा करावी. असा विचार करून झूसनें आपला एक दूत तें सोन्याचें नारिंग देऊन पॅरिसकडे पाठविला. त्यावेळीं पॅरिस जंगलांत आपल्या गुहेंत होता. देवदूतानें झूसचा निरोप पॅरिसला सांगितला. देवदूत म्हणाला, “ हेरा, ॲथिनी व ॲफ्रोडीटी या तीन देवतांमध्यें सर्वांत सुंदर कोण हें आपण ठरवावें असा झूसचा निरोप आहे. तुम्ही सर्वांत सुंदर तुम्हीच हा निकाल देण्यास लायक आहांत असें देवांच्या राजाला वाटते. जी देवता तुम्हास सर्वांत सुंदर वाटेल तिला हें नारिंग द्यावे. आज मध्यरात्रीं तिन्ही देवता तुमच्याकडे येतील. ” निरोप सांगून देवदूत निघून गेला. अशाप्रकारें एक सदस्य समिती नेमून झूसनें हा प्रश्न आपल्यापुरता निकालांत काढला. ही कामगिरी झूसनें आपल्यावर सोपवली म्हणून पॅरिसला आनंद झाला. त्याचें मन खुष झाले. देवांच्या राजानें मला सुंदरपणाचें सर्टिफिकीट दिलें. धन्य मी, देवतांच्या सौंदर्याची निवड करण्याचें काम मला दिलें. केवढी माझी योग्यता. अभिमान वाटला त्याला स्वतःबद्दल. पॅरिस आनंदानें बेहोश झाला. देवतांच्या स्वागताची त्यानें जय्यत तयारी केली व त्यांची वाट पहात तो गुहेच्या दाराशीं उभा राहिला.

बरोबर मध्यरात्रीं त्याच्या समोर एकाएकी तीन ढग निर्माण झाले—सोनेरी, रुपेरी व गुलाबी. सोनेरी ढगांतून हेरा बाहेर आली. ती म्हणाली, “ पॅरिस, तूं राज्याला व वैभवाला मुकला आहेस. धनगर म्हणून वाढलास व धनगर म्हणूनच तुला ओळखतात. पण तूं राजपुत्र आहेस. तूं महत्वाकांक्षी आहेस. राज्यपद तुला पाहिजे आहे. तुला अधिकार पाहिजे, सामर्थ्य पाहिजे, वैभव पाहिजे हें मी जाणते. यांची तुला तळमळ लागली आहे. सर्व कांहीं मी ओळखते. देवांची राणी आहे मी. तूं मला सर्वांत सुंदर ठरविलेंस तर मी तुझ्या सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण करीन. तुला राज्य देईन, राजवैभव देईन, संपत्ति तुझ्या पायाशीं लोळण घेईल. अत्यंत सुपीक तसेंच संपन्न व वैभवशाली शहरें असलेल्या प्रदेशाचा मी तुला राजा करीन. सुंदर व

उपयुक्त बंदरें व देशोदेशीं व्यापार करणारी जहाजें देईन. उत्तम आरमार व सामर्थ्य-वान् सैन्य तुझ्या दिमतीस देईन. आजुबाजूचे राजे तुझा अधिकार मान्य करतील. तूं सम्राट होशील. पहा. माझ्या बाजूचा निकाल दिलास तर हें सर्व तुला मिळेल. तें नारिंग मला दे व संपत्ति, अधिकार व वैभव भोग." हेराच्या भाषणानें पॅरिस मोहून गेला. हिलाच नारिंग द्यावें असें वाटून तो तें तिला देण्याच्या बेतात होता, तेवढ्यांत रुपेरी ढगांतून अॅथीनी बाहेर आली.

ती म्हणाली, "शहाणपण (Wisdom) अंगी नसेल तर संपत्ति, वैभव व अधिकार यांना काय मोल आहे? ती मातीमोल होतात. तुम्ही मानव एखादी गोष्ट करतांना स्वार्थी दृष्टीनें नफ्यातोट्याचा विचार करतां. तुमचें तारुण्य व पराक्रम, शहाणपणाअभावि फुकट जातात. तारुण्य व पराक्रमाला शहाणपणाची जोड असली तर जगकल्याणाची मोठमोठीं कार्यें घडून येतात. शहाणपण माणसाला धैर्य व सहनशीलता देते. संकटाचे पर्वत ओलांडण्याची ताकद देते. शहाणपणामुळें अंगीं शिस्त व संयम बाणतो. असा मानव जगाचा सम्राट होतो. सगळी मानवजात मोठमोठे राजेरजवाडे त्याच्या पायाशीं लोळण घेतात. अशी ही बादशाही तुला मिळेल. पण केव्हां. तूं जर तें नारिंग मला दिलेस, जर माझ्या बाजूला आलास तर मी सदैव तुझ्या बाजूला उभी राहीन" पॅरिसला संपत्ति, राजवैभव याचें आकर्षण होते खरें, पण अॅथीनीच्या गोड भाषणानेही तो आकर्षित झाला. अॅथीनीला तें नारिंग देण्याच्या तो अगदीं बेतांत होता. इतक्यांत गुलाबी ढगांतून अॅफ्रोडीटी बाहेर आली.

अॅफ्रोडीटी म्हणजे सौंदर्य देवता. तिच्या सौंदर्याकडे व मोहक हास्याकडे पॅरिस बघतच राहिला. अॅफ्रोडिटी म्हणाली, "पॅरिस, तूं मला सर्वांत सुंदर ठरविलेस व तें नारिंग दिलेस तर जगांतील सर्वांत सुंदर स्त्री मी तुला पत्नी म्हणून देईन." झालं. एवढ एकच वाक्य. मागेंपुढें न पहातां पॅरिसनें तें नारिंग तिला देऊन टाकलें. अॅफ्रोडिटी हेरा व ऑर्थनाकड पाहून हळूंच गालांत हंसली. हेरा रागावली. तिचे डोळे रागानें लाल झाले. अॅथिनीन भाला उंचावून धमकी दिली. दोघींनीही याचा सूड घेऊं म्हणून प्रतिज्ञा केली. तिन्हीं देवता अदृश्य झाल्या.

त्याकाळीं हेलन ही सर्वांत सुंदर स्त्री होती. पण तिचें लग्न झालेलें होतें. स्पार्टा देशाचा राजा मेनिलस याची ती पत्नी होती. अॅफ्रोडिटीच्या सांगण्यावरून पॅरिस प्रियाम राजाकडे गेला व राजपुत्राचा हक्क सांगूं लागला. प्रियामलाही भविष्याचें भय आतां वाटत नव्हते, त्यानें पॅरिसचा स्वीकार केला. कांहीं दिवसांनी निरनिराळ्या राजांच्या भेटीगांठी घेण्यासाठीं पॅरिस दौऱ्यावर निघाला. फिरतां फिरतां

तो स्पार्टाला आला. मेनिलस राजानें त्याचें राजपुत्रास साजेसें स्वागत केलें. राज पाहुणा म्हणून पॅरिस राजवाड्यांत राहिला. साहजिकच हेलन त्याच्या दृष्टीला अनेक वेळां पडली. हेलनच्या सौंदर्यानें त्याला वेड लावलें. ॲफ्रोडिटीनें हेलनच्या अंतःकरणांत बदल घडवून आणला व तिला पॅरिसकडे आकर्षित केलें. त्याचवेळीं मेनिलस लढाईसाठीं दूर देशीं गेली. हा संधि साधून ॲफ्रोडिटीच्या मदतीनें पॅरिसनें हेलनला पळवून ट्रॉयला आणली. मेनिलसला लढाईवरून परत आल्यावर हें कळलें. त्याला राग आला. हेलनला परत मिळविण्यासाठीं इतर ग्रीक राजांच्या मदतीनें त्यानें ट्रॉयवर स्वारी केली. ग्रीक व ट्रॉजन दोघेहि शूर लढवय्ये होते. सतत दहा वर्षें लढाई चालली. ट्रॉजनना जिंकणें ग्रीकांना अशक्य वाटूं लागलें. अखेरीस ग्रीकांचा शूर लढवय्या ऑडिसिस याच्या अक्कल हुषारीच्या जोरावर ग्रीकांनीं ट्रॉय जिंकलें. लढाईत अगोदरच पॅरिस व त्याचा भाऊ हेक्टर मारले गेले होते. ग्रीकांनीं शहराचा नाश केला. लोकांची कत्तल केली. राजवंश व ट्रॉजन लोक यांचा पूर्ण नाश केला. वैभवशाली ट्रॉय धुळीच्या रूपानें शिल्लक राहिलें. जळती मशाल कुऱ्हाडीचा दांडा गोत्यास काळ झाली. विधिलिखित चुकवून चुकत नाहीं.



# वासुदेव आणि गो-विश्वरूप

—संत विनोबा

वासुदेव हें नांव भागवत संप्रदायात चालतें. भागवत संप्रदाय हा वैष्णव संप्रदायाचाच एक प्रकार आहे, पण स्वतंत्र आहे. वासुदेवाची आणि त्याच्या भक्तालाच वासुदेव असें नांव देऊन त्याची भक्ति प्राचीन काळीं चालत असे. काही लोक वासुदेवाचे भक्त. काही लोक अर्जुनाचे भक्त. त्यांना वासुदेवक आणि अर्जुनक असें म्हणत. अर्जुनक आता शिल्लक राहिले नाहीत. कालांतरानें ते वासुदेवकांत मिसळून गेलेत.

तो जो वासुदेव आहे, तो भागवत धर्मात भगवंताचा मुख्य नामधारी आहे. भगवंताचीं नांवें अनेक आहेत. परंतु भागवत धर्मात वासुदेव हें नांव प्रधान आहे. जो सर्व विश्वांत वास करतो, तो वासुदेव. तुमची वस्ती जशी पवनारला, तशी वासुदेवाची वस्ती सर्व विश्वात आहे. "विश्व देखे वासुदेव, संत तो बहु दुर्लभ"— सबंध विश्वाला वासुदेव म्हणणारा, असा संत दुर्मिळ आहे.

हा वासुदेव शब्द कसा बनला ? देव म्हणजे भगवंत. वासु म्हणजे वसवणारा, सर्वांना वस्ती देणारा. असा जो देव त्याला म्हणतात वासुदेव. त्याचा उल्लेख ईशावास्योपनिषदांत आहे. "जगांत जें कांहीं जीवन आहे, तें हें सर्व ईश्वरानें वसविलेलें आहे." हें संस्कृतांतुन मराठींत केलें आहे. मूळ संस्कृतांत "ईशावास्यं इदं सर्वम्" अशी सुरवात आहे. त्यावरून वासुदेव शब्द आला. तो भागवत धर्माचा संस्थापक.

भारतांत रामायण, महाभारत आणि भागवत असे तीन ग्रंथ आहेत. रामायणात रामकथा आहे. भारतात कौरव-पांडव कथा आहे. त्यात सबंध भारत-भूमीचा इतिहास आहे. म्हणून त्याला नांव दिलें भारत. आणि भागवतात कृष्णकथा आहे. त्यात वासुदेवाला महत्त्व आहे.

## गो-विश्वरूप

गो-विश्वरूप ! गोरूप प्रभु आणि विश्वरूप प्रभु. संस्कृत भाषेत गो शब्दाचे अनेक अर्थ आहेत. गो म्हणजे वाणी. ती प्रभूची माणसाला अतुलनीय देणगी आहे. ही देणगी मनुष्य-सृष्टीलाच आहे. बाकी सृष्टीला वाणी नाही. जनावरांना वाणी नाहीं. ते काही आवाज काढतात गळ्यातून, पण ती वाणी नाहीं. अशी ही अमूल्य देणगी ईश्वरानें माणसाला दिली. कशी आहे ती देणगी ? रामदासस्वामींनीं म्हटलें आहे कीं, ब्रह्मांड-रचनेहूनहि चांगली शब्द-रचना आहे. कारण

ब्रह्मांडांत जी वस्तु नाहीं तीहि शब्दांत आली आहे. जसें मृगजळ शब्द. मृगजळ प्रत्यक्षांत नाहीं. तो भास आहे. वाळवंटांत सूर्याच्या किरणांमुळें उत्पन्न झालेला भास. तेव्हां अशी जी गोष्ट प्रत्यक्षांत नाहीं, ब्रह्मांडांत नाहीं, ती शब्दांत आली. ह्या विश्वांत जेवढी रूपें आहेत, त्या सगळ्यांचें बरोबर ज्ञान वाणीनेंच होऊं शकणार. आतां कांहीं ज्ञान हातांनीं होऊं शकते. कांहीं पायांनीं होऊं शकतें. कांहीं कानांनीं होऊं शकतें. कांहीं डोळ्यांनीं होऊं शकतें. असें, ह्या ज्ञान-कर्मेंद्रियांपासून कांहीं ज्ञान मिळूं शकतें. परंतु वाणीशिवाय त्याचें स्पष्ट ग्रहण होणें अशक्य आहे. अशी ही वाणी ईश्वरानें मनुष्याला दिली. आणि तें ईश्वराचें रूप आहे.

'गो'चा दुसरा अर्थ आहे गाय. मूत्रशेणापासून तो दुधापर्यंत, सर्व पदार्थ आमच्या समोर ठेवून गाय आमच्या सेवेला उभी आहे. अशी ही गाय भगवंताचें रूप नाहीं का ? गाईचें रूप डोळ्यासमोर आणा. प्रत्यक्ष भगवंत गाईच्या रूपानें आमची सेवा करीत आहे. आणि म्हणून आम्हाला गाईची उत्तम सेवा करायला हवी.

'गो'चा तिसरा अर्थ आहे भूमिमाता. ही भूमिमाता आज आम्हा सर्वांचें धारण करून राहिली आहे. आमचा भार वाहत आहे, आणि आमचें धारण करीत आहे. भगवंत गोरूपांत आमच्या समोर येतो, तो वाणीच्या रूपात, गाईच्या रूपांत आणि भूमीच्या रूपांत. म्हणून आपण वाणीचा, गोमातेचा आणि भूमातेचा चांगला उपयोग केला पाहिजे, आणि त्यांची उत्तम सेवा केली पाहिजे.

ईश्वराचे दुसरें नांव आहे विश्वरूप. हें तर भयानक नांव आहे. आतांपर्यंत पाहिलींत त्या नांवांसारखें हें नांव नाहीं. भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूप दाखविलें आणि अर्जुन भयभीत झाला. भगवंताच्या त्या रूपांत त्याला सारें ब्रह्मांड दिसू लागले. आणि तें पाहून तो घाबरला. हें सारें वर्णन गीतेच्या अकराव्या अध्यायांत आहे. समजा, आतां तुम्ही येथें बसला आहांत, आणि होऊन गेलेल्या गोष्टी, चालू गोष्टी, होणाऱ्या गोष्टी सर्व एकमद तुमच्यासमोर दिसू लागल्या, तर तुमची काय स्थिति होईल ? तुम्ही घाबराल की नाहीं ?

तसें अर्जुनाचें झालें व तो घाबरला. म्हणून विश्वाचा जो भाग दृश्य आहे, तोच आमच्या कामाचा. तेवढाच आमच्यासाठीं बस आहे. तेवढ्याचीच सेवा करायची. पण ईश्वरात सर्व विश्व सामावलेलें आहे. सर्व विश्वात तो व्यापलेला आहे. अशा रीतीनें विश्वात जेवढीं रूपें आहेत, तीं सर्व भगवत्स्वरूप आहेत. आणि त्यांचीं अनेक नांवेंहि भगवत्स्वरूप आहेत.

---




# ऑक्टोबर १९६७

या महिन्यांत भक्तांची संख्या शिर्डीस नेहमीप्रमाणेंच होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें —

## कीर्तन

श्रीमती जानकीबाई केशवराव इंगळे ( गोरेगांव, मुंबई )

श्री. ह. भ. प. जेऊरकर ( बाबा मु. जेऊर जि. अहमदनगर )

श्री. गोपाळ नारायण गुर्जर, पाध्ये ( नासिक )

संस्थान गवई मराठे यांची पुण्यतिथी उत्सवात दोन व नेहमीची दोन अशी चार कीर्तनें झालीं.

## प्रवचन

डॉ. के. बी. गव्हाणकर ( कुर्ला मुंबई )

श्री. दत्तात्रय वामन जोशी [ भारत प्रवासी ] ( अमळनेर पूर्व खानदेश )

श्री. निलकंठदास माधवराव मूळपल्लीवार ( मु. बिसी. ता. वरोडा )
जि. चंद्रपूर ( म. प्र. )

## गायन

श्री. शकुंतलाबाई पळसोकर ( संगीत अलंकार ) अकोला विदर्भ

सौ. शोभा विश्वनाथ गुर्टू, ग्रँटरोड मुंबई

श्री. तुळशीरामबुवा दिक्षीत, कुर्ला मुंबई

श्री. मारुतीबुवा वागडे, मुंबई. कु. सुबोदिनी खेडकर, मुंबई

सौ. शुभलक्ष्मी ताम्हणे, मुंबई. श्री. पुरुषोत्तम शंकर फडके, इंदोर

श्री. विनायक पांडुरंग वेलकर, कल्याण ( ठाणें ) श्री. भालचंद्र सोहनी, इंदौर

श्री. लक्ष्मण गणपतराव देवासकर, कुर्ला मुंबई

श्री. चंद्रकांत केशव इंगळे, मालाड मुंबई. सौ. मिराबाई राजगोपाळ स्वामी, खार, मुंबई. सौ. कमळाबाई सांडभोर, पुणें.

नकला

श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणे. श्री. दिगंबर भिकाजी बिडवे, शिर्डी.

तबलावादन

श्री. विनायक वासुदेव इंगळे, अंधेरी-मुंबई

श्री. दामुअण्णा माळी, मुंबई ( दादर ) श्री. बाबुराव सालकर, कोपरगांव.

हार्मोनियमवादन

श्री. लक्ष्मण वामन पोफळकर, अकोला ( विदर्भ ).

जादू प्रयोग

श्री. भरतकुमार लांडे ( मु. वेलापूर, अहमदनगर )

बँडवादन

अबदुल रज्झाक ब्रांस बँड कंपनी ( करमाळे, जि. शोलापूर )

सनईवादन

श्री. नाना रघुनाथ कोराटे ( शिर्डी )

भजन

श्री. मदनमोहन जोशी कलापथक ( इंदौर )

श्री. चंद्रशेखर कर्णिक ( पुणें ) श्री. इ. एम्. घनसिंगस्वामी ( पुणें )

कुमार प्रदीप सातर्डेकर ( परेल मुंबई ) श्री. शाम नौशेर ( पिंपळगांवनगर )

श्री. श्रीराम विष्णु सातर्डेकर ( परेल मुंबई )

श्री. दयानंद केशव इंगळे ( गोरेगांव मुंबई ) श्री. साईरमणम् ( शिर्डी )

श्री. भिकू भगवान कुडतरकर (मुंबई) श्री. चरणदास दामाजी (बुलढाणा विदर्भ)

श्री. उत्तम उन्हाळें ( [illegible]लढाणा) श्री. लक्ष्मी शशिवदन डेलीवाला ( भावनगर )

### कोजागरी पौर्णिमा

रात्रौ १० ते १२ पर्यंत श्री. के. बी. गव्हाणकर डॉक्टरसाहेब कुर्ला यांचे प्रवचन व श्रींचे समाधीस तुळशीदल सहस्रअर्चन पूजा व रात्रौ १२ वाजतां चंद्रपूजा. हस्ते श्री. विठ्ठलराव बागवे मंदीर (प्रमुख) रात्रभर जागर व सर्वांस तीर्थ, दूध, प्रसाद व पोहे वाटण्यांत आले.

### आनंदाची घटना

समाधि मंदिर व संस्थान मालकीच्या इमारती यांचे परिसरांत असलेली १ ए. २८ गुं. ११ आणे क्षेत्राचे जमिनीचें सरकारी आदेशाप्रमाणें ग्रामपंचायत शिर्डी यांचेकडून माननीय रिसिव्हरसाहेब श्री. डी. डी. पाटणकर यांनीं खरेदीखत करून घेतलें आहे. ही जागा संस्थानला संपादन झाले ते पूर्व नियोजित मास्टर प्लॅन कार्यान्वित होण्याचे दृष्टीनें असलेली अडचण निवारण झाली आहे.

## तत्त्वज्ञ इमर्सन सूक्ति–संग्रह

जर तुम्ही गुलामाच्या मानेभोंवती शृंखला गुंडाळाल, तर त्या शृंखलेचे दुसरें टोंक खुद्द तुमचाच गळा जखडील.

—जे अध्यात्मवाद भौतिक शक्तीपेक्षां प्रभावी आहे आणि जगावर विचारांचें राज्य आहे, याची जाणीव बाळगतात तेच थोर लोक आहेत.

—प्रत्येक क्रांति म्हणजे एके काळीं एका माणसाच्या मनांतील विचार होता, आणि हाच विचार दुसऱ्या माणसाच्या मनांत आला कीं, तो त्या युगाचा प्रारंभ ठरतो.

—सत्य पूर्णपणें उमगण्यासाठीं माणूस त्याविरुद्ध अगोदर झगडला असला पाहिजे.